महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०२५

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

गुरुवार, दिनांक १० जुलै, २०२५ / आषाढ १९, १९४७ (शके)

(१)	**वैद्यकीय शिक्षण मंत्री**	**यांचे प्रभारी विभाग**
(२)	**पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**	
(३)	**मृद व जलसंधारण मंत्री**	
(४)	**उद्योग, मराठी भाषा मंत्री**	
(५)	**महिला व बालविकास मंत्री**	
(६)	**ग्रामविकास व पंचायत राज मंत्री**	
(७)	**कामगार मंत्री**	
(८)	**सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**	

प्रश्नांची एकूण संख्या - ३८

मणिबेली (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) येथील शुलपाणेश्वर भक्त निवासामध्ये झालेला गैरव्यवहार

(१) * १०२५८ श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मणिबेली (ता. अक्कलकुवा, जि.नंदुरबार) ग्रुप ग्रामपंचायत ही मणिबेली, जागंठी व धनखेडी या तीन महसुल गावांची पंचायत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शुलपाणेश्वर हे गुजरात राज्यातील गाव असून ते पूर्णपणे सरोवर प्रकल्पामध्ये बुडिताखाली गेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गावाचे नाव महाराष्ट्रात नसताना देखील माजी जिल्हा परिषद सदस्य श्री.किरणसिंग वसावे, मौजे देवमोगरा (ता.अक्कलकुवा जि.नंदुरबार) यांनी शुलपाणेश्वर महादेवाचे भक्त निवासाकरिता लाखो रुपये मंजूर करून शासनाची फसवणूक केल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी लोकप्रतिनिधी यांना निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले त्याअनुषंगाने उक्त गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे : (१) हे खरे आहे.

मणिबेली ही ग्रुप ग्रामपंचायत आहे. सदर ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये मणिबेली, जांगठी व धनखेडी या तीन महसुली गावांचा समावेश होतो.

(२) हे खरे नाही.

शुलपाणेश्वर हे गाव नसून प्रचिन मंदिर आहे.

(३) सदर तिर्थक्षेत्राच्या ठिकाणची विकास कामे पर्यटन विभागाच्या प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत मंजूर करण्यात आली आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना प्रकरणामध्ये चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात वैद्यकीय सुविधा उपलब्ध करणेबाबत

(२) * ८०८९ श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालयात मंजूर खाटांच्या तुलनेत रुग्णांची संख्या तिप्पट असून बाह्यरुग्ण विभागात अत्यावश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात कॅन्सर तपासणी व उपचार युनिट बंद असणे, अपुऱ्या वैद्यकीय सोयी-सुविधा व प्रशासकीय बाबींची पुर्तता करणे इत्यादी अशा एकूण १० बाबींचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला असून अद्याप त्यावर कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास मंजूरीसह निधी देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांना दिनांक १४ एप्रिल, २०२५, दिनांक १५ व १७ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रुग्णालयातील कॅन्सर युनिट सुरु करणेसह सर्व अत्यावश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ : (१) नाही.

(२) कार्यवाही चालू आहे.

(३) होय.

(४) राज्यातील जनतेस सर्व समावेशक कॅन्सर उपचार उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

वरवणे (ता.पेण, जि.रायगड) येथील आदिवासी विद्यार्थीनीच्या मृत्यू प्रकरणी नुकसान भरपाई मिळणेबाबत

(३) * ११००६ श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्ठरोग सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) या अभियानांतर्गत वरवणे (ता.पेण, जि.रायगड) येथील एकात्मिक आदिवासी विकास विभागाच्या ३० शासकीय आश्रम शाळेतील इयत्ता ४ थी वर्गातील विद्यार्थ्यांची दिनांक १६ डिसेंबर,२०२४ पासून तपासणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तपासणी करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांमधील कुमारी खुशबू नामदेव ठाकरे (वय ९ वर्षे) या विद्यार्थीनीच्या पालकांची परवानगी न घेता परस्पर कृष्ठरोगाचे औषध सुरु केल्याने रिॲक्शनमुळे तीचा मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विद्यार्थीनीच्या मृत्यूच्या चौकशीसाठी विशेष समिती स्थापन करुन तसा अहवाल १५ दिवसांत शासनाला सादर करावा तसेच क्लिनिकल विश्लेषण अहवाल तात्काळ सादर करावा व कुटुंबियांना रु.१० लाखाची नुकसान भरपाई द्यावी अशा आशयाचे निवेदन कुटुंबियांनी व गावातील मोर्चेकऱ्यांनी तहसिलदार, पेण यांना दिनांक ६ मे,२०२५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, सदर घटनेची अद्यापही चौकशी झाली नसल्याने दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी आदिवासी जनतेकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या प्रकरणात दोषी असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करणेसह कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे खरे आहे.

दिनांक १६ ते २० डिसेंबर, २०२४ या कालावधीत सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत कुष्ठरोग सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) अभियान राज्यभर राबविण्यात आले. त्यानुसार वरवणे (ता. पेण, जि. रायगड) येथील एकात्मिक आदिवासी विकास विभागाच्या ३० शासकीय आश्रम शाळेतील इयत्ता ४ थी वर्गातील विद्यार्थ्यांची या कालावधीत कुष्ठरोगासाठी तपासणी करण्यात आली.

(२) हे खरे नाही.

राज्यात कुष्ठरोगासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत नियमित सर्वेक्षण करण्यात येते. नियमित सर्वेक्षणादरम्यान माहे डिसेंबर, २०२४ च्या ६ महिन्यांपूर्वी कु.खुशबू नामदेव ठाकरे हिच्या डाव्या डोळयाच्या खाली चट्टा असल्याने तिच्यावर लगेच कुष्ठरोग औषधोपचार सुरु करण्यात आले नव्हते, मात्र तिला देखरेखीखाली ठेवण्यात आले होते. जेव्हा दिनांक १६ डिसेंबर, २०२४ पासून कुसुम अभियान सुरु करण्यात आले, त्यावेळेस वरवणे (ता. पेण, जि. रायगड) येथील आश्रमशाळेतील एकूण ३०५ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. या तपासणीदरम्यान कु. खुशबू नामदेव ठाकरे, वय ०९ वर्ष, आश्रम शाळा हटवणे/वरवणे, ता.पेण, जि.रायगड या विद्यार्थीनीला डाव्या डोळयाच्या खाली परत कायम चट्टा दिसला म्हणून वैद्यकीय अधिकारी यांनी दिनांक १८/१२/२०२४ रोजी सांगितल्यानुसार कुष्ठरोग विरोधी बहुविध औषधोपचार सुरु करण्यात आले होते. सदर विद्यार्थीनी आश्रमशाळेत राहत असल्याने उपचाराबाबत वसतिगृह अधिक्षिका यांना पूर्ण मार्गदर्शन करुन माहिती देण्यात आली होती.

मात्र माहे जानेवारी, २०२५ मध्ये कु.खुशबू नामदेव ठाकरे हिला १० दिवसांपासून ताप व पोटफुगी, ४ दिवसांपासून डोळयाच्याभोवती व पायावर सूज असल्यामुळे तिला महात्मा गांधी मिशन वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, कामोठे, नवी मुंबई येथे दिनांक १६ जानेवारी, २०२५ रोजी बालरोग विभागाच्या आंतर रुग्ण कक्षात भरती करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक २२ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ११.०५ वाजता तिचा मृत्यू झाला. सदर रुग्णालयाकडील केस पेपरमध्ये कु. खुशबू नामदेव ठाकरे हिस Dapsone Hypersensitivity, Fulminant Liver Failure, Exfoliative Rash, Hepatosplenomegaly, Glossitis and Chelitis and Shock चा संशय असल्याचा उल्लेख आहे.

कु. खुशबू नामदेव ठाकरे हिच्या मृत्यूनंतर महात्मा गांधी मिशन वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, कामोठे, नवी मुंबई यांनी तिचे शव पोलिसांच्या ताब्यात दिले व त्यानुसार दिनांक २२ जानेवारी, २०२५ रोजी

सायंकाळी ०५.४५ ते ०६.४५ दरम्यान उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे कु. खुशबू नामदेव ठाकरे हिचे शवविच्छेदन करण्यात आले. शव विच्छेदन अहवालनुसार टिशु (Tissue) हिस्टो पॅथोलोजीकल तपासणी व रक्ताचे नमुने केमिकल विश्लेषणसाठी पाठविण्यात आलेले असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर मृत्यूचे कारण स्पष्ट होईल, असे शवविच्छेदन अहवालात नमूद आहे. सदर नमुन्याचे अहवाल अद्याप अप्राप्त आहेत.

(३), (४) व (५) ग्राम संवर्धन सामाजिक संस्था मु. बांधनवाडी पो. खारपाडा, ता.पनवेल, जि. रायगड यांनी दि.६/०५/२०२५ रोजी तहसिलदार, पेण यांच्याकडे या आशयाचे निवेदन दिलेले आहे.

कु.खुशबू नामदेव ठाकरे या विद्यार्थीनीच्या मृत्यू प्रकरणी सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, कुष्ठरोग, राज्य कुष्ठरोग कार्यालय, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमण्यात आली.

सदर चौकशी समितीने दि.०७/०२/२०२५ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार, मृत्यू सारांश अहवालामध्ये कु.खुशबू नामदेव ठाकरे हिचे प्राथमिक निदान Fulminant Hepatic Failure due to Dapsone induced Hypersensitivity असे आहे. सकृतदर्शनी आरोग्य संस्थेमार्फत सदर रुग्णास सुरुवातीला औषधे दिल्यानंतर समुपदेशन करण्यात आले होते. आरोग्य अधिकारी / कर्मचारी, शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, वरवणे येथील वसतिगृह अधिक्षिका व सहकारी यांनी नियमितपणे पाठपुरावा केल्याचे निदर्शनास आले नाही. यापुढे अशा घटना घडू नयेत यासाठी औषधोपचार सुरु असलेल्या रुग्णांस अधिकारी / कर्मचारी यांनी वारंवार पाठपुरावा करणे, रुग्ण व कुटुंबियांचे समुपदेशन करणे, विविध स्तरावर संदेशवहनाची साखळी मजबूत करुन दक्षतेने काम करणे अशी तजवीज ठेवण्यात आली आहे.

तथापि, कु. खुशबू नामदेव ठाकरे हिचे शवविच्छेदनानंतरचे टिशु (Tissue) हिस्टो पॅथोलोजीकल तपासणी अहवाल व रक्ताचे नमुने केमिकल विश्लेषण अहवाल अद्याप प्राप्त झाले नसल्यामुळे मृत्यूचे कारण अजून अस्पष्ट आहे.

तसेच, आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण जि.रायगड या कार्यालयाच्या स्तरावरुन कु.खुशबू नामदेव ठाकरे या विद्यार्थीनीच्या मृत्यू प्रकरणी दि.२४/०१/२०२५ रोजी चौकशी करण्यात आली. त्यानुसार मुख्याध्यापक व स्त्री अधिक्षिका यांना मा.अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांनी दिनांक ०६/०३/२०२५ पासून निलंबित केले आहे.

कै.कु.खुशबू नामदेव ठाकरे हिच्या कुंटुंबियांना शासन नियमाप्रमाणे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण जि.रायगड या कार्यालयाकडून रुपये २,००,०००/- (दोन लक्ष) सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंढेगाव (जि.नाशिक) येथील जिंदाल पॉलिफिल्म्स कारखान्याला लागलेल्या आगीबाबत

(४) * १०७४२ श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंढेगाव (जि.नाशिक) येथील जिंदाल पॉलिफिल्म्स कारखान्याला गेल्या अडीच वर्षात दोन वेळा आग लागली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जानेवारी, २०२३ मध्ये आग लागल्यानंतर चौकशी समिती नेमण्यात आली असता सदरहू चौकशी समितीने कारखान्यात सुरक्षेसंबधीच्या नियमांचे उल्लंघन झाल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संपूर्ण प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यासह अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर : (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

सदर घटनेची कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, संचालनालयाकडून चौकशी करण्यांत आलेली असून सदर चौकशीत व्यवस्थापनाकडून नियमांचे उल्लंघन झाल्याचे निष्पन्न झाल्याने कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द मुख्य न्यायदंडाधिकारी, नाशिक यांचे न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.

अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, याकरीता कारखान्यास उपाययोजना सुचविण्यांत आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

कस्तुरबा सेवाग्राम रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय सेवाग्राम (जि.वर्धा) येथे जिल्ह्याचे पालक सचिव यांची प्रशासक म्हणून नेमणूक करणेबाबत

(५) * १२३२८ श्री.राजेश बकाने (देवळी) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कस्तुरबा हेल्थ सोसायटीद्वारा संचालित कस्तुरबा सेवाग्राम रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय सेवाग्राम (जि.वर्धा) हे केंद्र शासनाचे ५०% व राज्य शासनाचे २५% अनुदानाच्या सहकार्याने चालवले जात असून येथे वैद्यकीय उपकरणांची तसेच तज्ञ डॉक्टरांची कमतरता असल्यामुळे रुग्णांना आरोग्य विषयक सोयी-सुविधा उपलब्ध होत नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयाच्या प्रशासनाच्या आडमुठी धोरणामुळे शासकीय योजनांची अंमलबजावणी न होणे, व्यवस्थापनाकडून कर्मचाऱ्यांना योग्य वागणूक न देणे, कर्मचाऱ्यांना योग्य प्रमाणात वेतन न देणे इ.बाबी होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रुग्णालयात शासनस्तरावरून कार्यवाही करून जिल्ह्याचे पालक सचिव यांची प्रशासक म्हणून नेमणूक करुन संस्थेचे ऑडीट करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ : (१) हे खरे नाही.

सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात दररोज साधारणपणे १५०० ते २५०० बाह्य रुग्ण येत असतात. रुग्णालय मागील ५५ वर्षांपासून गोरगरीब नागरिकांसाठी माफक दरात दर्जेदार आरोग्य सुविधा पुरविण्याचे काम करीत आहे. रुग्णांना डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात.
(२) हे खरे नाही.

रुग्णालयाचे प्रशासनामुळे रुग्णांची हेळसांड होत असल्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार कस्तुरबा रुग्णालयाचे व्यवस्थापनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. कस्तुरबा रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती पत्रात

नमूद केलेले वेतन नियमाप्रमाणे अधिकोषाद्वारे संबंधित कर्मचाऱ्यांचे खात्यात प्रत्येक महिन्याला थेट जमा केले जाते.
(३) संस्थेचे प्रत्येक वर्षाचे ऑडिट हे महालेखापाल कार्यालयाद्वारे (CAG) होत असल्याने स्वतंत्र प्रशासक नियुक्त करुन संस्थेचे ऑडीट करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील महिला व बाल विकास विभागांतर्गत निधीमध्ये झालेला अपहार

(६) * १२६६८ श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील महिला व बाल विकास विभागांतर्गत मिनी दल, राईस मिल, कुक्कुटपालन व शेळी पालन शेड इत्यादी प्रकल्पासाठी रु. ४ कोटी ९९ लक्ष इतक्या रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्प न राबविता कार्यान्वित यंत्रणा व ठेकेदार यांनी संगनमताने रु. ४ कोटी ६ लाख इतक्या रकमेचे देयक काढून निधीचा अपहार केल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुसार यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी तसेच ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे : (१) होय.
(२),(३) व (४) सदर प्रकरणी खरेदी धोरणानुसार निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून त्यामध्ये एल-१ ठरलेल्या मे.महिला आधार औद्योगिक सहकारी संस्था, पुणे या संस्थेच्या कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आले होते. मे.महिला आधार औद्योगिक सहकारी संस्था, पुणे या कंत्राटदार संस्थेने केलेल्या मागणीनुसार रु.४.०६ कोटी इतका निधी वर्ग करण्यात आला होता. संबंधित कंत्राटदार यांनी तांत्रिक कारणास्तव झालेला विलंब व व्यक्तीगत अडचणी विचारात घेता कामकाज पूर्ण होऊ शकत नसल्याने, सदरचा निधी संबंधित कंत्राटदाराने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, ठाणे यांना परत केला आहे. तथापि, सदर प्रकरणी सविस्तर चौकशी करण्यात येत आहे.

राज्यातील रॅगिंगची प्रकरणे रोखण्याकरिता उपाययोजना करणेबाबत

(७) * ८१६४ श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रॅगिंगची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून नाशिक जिल्ह्यातील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामध्ये सन २०२२ ते २०२४ या कालावधीत रॅगिंगच्या सर्वाधिक ६१ तक्रारी दाखल झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठ रॅगिंगच्या तक्रारीबाबत राज्य तिसऱ्या क्रमांकावर असल्याचे सोसायटी अग्रेन्स्ट व्हायोलन्स इन एज्युकेशन (सेव्ह) या संस्थेच्या अहवालातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणामध्ये मृत्युमुखी पडलेली किती प्रकरणे आहेत व उर्वरित किती प्रकरणे आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रॅगिंगची प्रकरणे रोखण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ : (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०२२ ते सन २०२४ पर्यंत नॅशनल अँटी रॅगिंग पोर्टलच्या माध्यमातून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे ५० तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सदर प्राप्त ५० तक्रारींची महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने तात्काळ दखल घेतलेली आहे.
(२) सोसायटी अगेंन्स्ट व्हायोलेन्स इन एज्युकेशन (सेव्ह) या संस्थेच्या महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ रॅगिंगच्या तक्रारींबाबत अहवाल शासनाकडे उपलब्ध नाही.
(३) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे प्राप्त झालेल्या तक्रारींमध्ये कुठल्याही विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक मार्फत सदर तक्रारींचे वर्गीकरण केले असता, त्यापैकी ०९ गंभीर स्वरुपाच्या तक्रारी असून ४१ सामान्य स्वरुपाच्या तक्रारी आहेत.
(४) व (५) राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी रॅगिंग विषयी उपाययोजना करण्यासाठी National Medical Commission (Prevention & Prohibition of Ragging in Medical Colleges & Institutions) Regulations, २०२१ प्रसिद्ध केले आहेत. सदर नियमांनुसार राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता स्तरावर स्वतंत्र अँटी रॅगिंग समितीची स्थापना करण्यात आली असून, सदर समिती वेळोवेळी विद्यार्थ्यांच्या समस्यांबाबत आढावा घेत असते. तसेच अधिष्ठाता स्तरावर गठीत अँटी रॅगिंग समितीने महाविद्यालयात होणारे रॅगिंग रोखण्यासाठी वेळोवेळी उपाययोजना करणेबाबत संचालनालयामार्फत सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

बीड जिल्हयात बालविवाहासंदर्भात आरोग्य विभागाच्या प्रजनन व बाल आरोग्य (RCH) पोर्टलवरील असलेल्या नोंदीबाबत

(८) * ७७३९ श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राजन नाईक (नालासोपारा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :
(१) बीड जिल्हयात बालविवाहासंदर्भात आरोग्य विभागाच्या प्रजनन व बाल आरोग्य (RCH) पोर्टलवरील नोंदींमध्ये गेल्या वर्षभरात १८ वर्षांखालील १२ मुली गर्भवती होणे, त्यापैकी ११ मुलींची प्रसूती होणे इत्यादी बाबतची माहिती नमूद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या १३ ते १७ वर्षे वयोगटातील बहुतांश मुली लैंगिक अत्याचाराच्या बळी ठरल्या असून, गेवराई, वडवणी, आष्टी, केज, धारूर आणि शिरूर कासार या तालुक्यांमधील घटनांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आरोग्य विभागाच्या पोर्टलवरील नोंदींनुसार गर्भवती अल्पवयीन मुलींच्या पतींची नावही नोंदविली गेली असल्यामुळे या मुलींचे बालविवाह झाल्याचे स्पष्ट होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६ अन्वये संबधित दोषींवर कारवाई करणेसह बालविवाह रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे अंशत: खरे आहे.

माहे एप्रिल, २०२४ ते माहे मार्च, २०२५ या कालावधीमध्ये बालविवाहामुळे १४ गर्भवती मातांची नोंद पोर्टलवर झाली असून त्यापैकी ०७ माता प्रसूत झालेल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

आर.सी.एच पोर्टल हे केंद्र शासनाने तयार केले असून, त्यामध्ये जननक्षम जोडपी ,गरोदर माता व बालक यांची नोंदणी व दिलेल्या सेवांचे अद्ययावतीकरण केले जाते, त्यामध्ये लैंगिक अत्याचाराच्या बळी ठरल्याच्या नोंदी करता येत नाही .जननक्षम महिलेंची गर्भधारणा चाचणी पॉझिटिव्ह आल्यानंतर अशा स्त्रीची गरोदर माता म्हणून नोंद घेतली जाते व अशा नोंद घेताना गरोदर माता व तिच्या नव-याचे नाव घेतले जाते. आभा कार्ड आरसीएच पोर्टलला लिंक करताना गरोदर मातेचे वय आधार कार्ड नंबरच्या सहाय्याने आधार पोर्टलवरुन घेतले जाते.

(३) हे खरे आहे.

(४) या अनुषंगाने अशा घटना निदर्शनास आल्यास बालविवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ च्या कायद्यानुसार कारवाई करणेबाबत सर्व आरोग्य संस्थांना कळविण्यात आले आहे.

राज्यात बालविवाह रोखण्यासाठी बालविवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ कार्यान्वित असून महाराष्ट्र बाल विवाह प्रतिबंधक नियम, २०२२ तयार करण्यात आले आहेत.

राज्यातील प्रत्येक ग्राम पंचायतीतील ग्राम सेवकांना त्यांच्या ग्राम क्षेत्रात बाल विवाह प्रतिबंध अधिकारी घोषित करण्यात आले असून त्यांना सहाय्य करण्यासाठी अंगणवाडी सेविका यांना नियुक्त करण्यात आले आहे. तसेच नागरी भागासाठी बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना व सहाय्यक बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून अंगणवाडी पर्यवेक्षिका यांना घोषित करण्यात आलेले आहे.

प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा बाल संरक्षण कक्षाची स्थापना करण्यात आली असून शासनाच्या मार्गदर्शनानुसार शाळा, वाडी, शासकीय कार्यालय यांच्यामध्ये बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा देखील घेण्यात आलेल्या आहेत.

आशा स्वयंसेविका, आरोग्य सेविका, आरोग्य सेवा, समुदाय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत बालविवाहामुळे मुली व बाळाच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र,मैत्री क्लिनिक मध्ये बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ संबंधी प्रसिध्दी व पालकांचे समुपदेशन केले जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शासकीय रुग्णालयांमधील सुरक्षा यंत्रणांमध्ये सुधारणा करणेबाबत

(९) * ७३७५ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अमित विलासराव देशमुख

(लातूर शहर), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील मिरज सिव्हिल हॉस्पिटलमधून अर्भक चोरीच्या घटना सीसीटीव्हीत दिसून आल्याचे माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, या रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल झालेल्या श्रीमती कविता आलदर या महिलेच्या तीन दिवसांच्या अर्भकाला अज्ञात महिलेने पळवून नेल्याबाबतचे निवेदन समर्थन संस्थेने दिनांक २८ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य, मा. मंत्री, महिला व बालविकास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, आरोग्य सेवा संचालनालय तसेच जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडे दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा घटना नाशिक जिल्हयात माहे जानेवारी, २०२५ मध्ये तसेच यापूर्वीही राज्यातील इतर शासकीय रुग्णालयातही प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, यामुळे महिलांच्या प्रसुती व नवजात बालकांच्या सुरक्षेला धोका निर्माण होत असल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांचा शासकीय रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्थेवर विश्वास नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने मिरज येथील प्रकरणातील संबधित आरोपीवर कारवाई करण्यासह राज्यातील सिव्हिल हॉस्पिटलमधील सुरक्षा यंत्रणा, सीसीटीव्ही निरीक्षण, रुग्ण व नातेवाईकांच्या हालचालींची नोंद यामध्ये सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ : (१), (२), (३), (४) व (५) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज येथून अर्भक अपहरणाची घटना घडली असता ही बाब निदर्शनास आल्यानंतर तातडीने महात्मा गांधी चौक पोलीस स्टेशन, मिरज यांना पाचारण करण्यात आले. पोलीस प्रशासनाने अपहरण झालेले अर्भक ३ दिवसांमध्ये रुग्ण सौ. कविता आलदर यांच्याकडे सुखरुप सुपूर्द केले आहे.

तसेच, जिल्हा रुग्णालय, नाशिक येथील प्रसुती कक्षातून नवजात शिशूचे अपहरण झाल्याची तक्रार केल्यानंतर पोलीसांनी तपास करुन नवजात बालक व अपहरणकर्ती महिला यांना शोधून काढले आहे. राज्यातील सर्व शासकीय महाविद्यालय व रुग्णालयांमधून बालकांचे अपहरण/चोरी यांना प्रतिबंध करण्यासाठी कार्यप्रणाली (SOP) तयार करण्यात आली असून त्याची अंमलबजावणी लवकरच करण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

कर्जत (जि. रायगड) येथील भालीवडी ग्रामपंचायत हद्दीत अपुऱ्या आरोग्य सुविधांमुळे गर्भवती महिलेचा झालेला मृत्यू

(१०) * १२१५६ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि. रायगड) येथील भालीवडी ग्रामपंचायत हद्दीत अपुऱ्या आरोग्य सुविधांमुळे लाखाची वाडीतील श्रीमती माधुरी रोहन मुकणे, वय वर्षे २० या गर्भवती महिलेची प्रकृती गंभीर झाल्याने तिला कशेळे ग्रामीण

रुग्णालयात नेत असताना मृत्यू झाला असल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बाबीची तक्रार समर्थन संस्थेने मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग, मा. मंत्री, महिला व बालविकास तसेच प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य, आरोग्य सेवा संचालनालय यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामपंचायतीच्या हद्दीत अपुऱ्या आरोग्य सुविधामुळे गरीब सामान्य गर्भवती महिलांना उपचारासाठी नेहमीच वंचित रहावे लागत असून त्यामध्ये बऱ्याचदा त्यांचा मृत्यूही होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार ग्रामीण भागात आरोग्य सोयी-सुविधा उपलब्ध करणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे खरे नाही.

श्रीमती माधुरी मुकणे या गर्भवती मातेची प्राथमिक आरोग्य केंद्र कडाव कार्यक्षेत्रातील भालीवडी उपकेंद्रात आरसीएच न. १२७०३१७३९३४१ अशी नोंदणी दि. ०१/ १०/ २०२४ रोजी करण्यात आली होती. त्यांच्या प्रसुतीचा अपेक्षित दिनांक २३/०४/२०२५ असा होता. सदर गर्भवती मातेची प्राथमिक आरोग्य केंद्र, कडाव येथे ०४ वेळा रुग्णालयीन तपासणी करण्यात आली होती व ०२ वेळा आशा सेविकेने गृह भेटी दिलेल्या होत्या. तसेच प्रसुतीकरिता संदर्भ सेवा देण्याबाबत समुपदेशनही करण्यात आले होते. सदर माता सिकलसेल पॉझिटीव्ह असल्यामुळे त्यांना फॉलिक ॲसिडच्या गोळया देण्यात आल्या होत्या. सदर गर्भवती माता अति जोखमीची होती.त्यामुळे त्यांना रुग्णालयात प्रसुती करण्याचा सल्ला देण्यात आला होता. त्यांनी वैद्यकीय सल्याविरुध्द घरी प्रसुती केली. प्रसुतीनंतर मातेला अतिरक्तस्त्राव होत असल्यामुळे ग्रामिण रुग्णालय, कशेळी येथे आणले परंतू रुग्णालयात पोहोचण्यापुर्वीच गर्भवती मातेचा मृत्यू झाला.

(२) हे खरे नाही.

तथापि,समर्थन संस्थेने दि.२२/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये रुग्णवाहिकेच्या इंधनाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याकरिता शासनास विनंती केली आहे.

(३) हे खरे नाही.

रायगड जिल्ह्यात एकूण ५५ प्राथमिक आरोग्य केंद्र व २८० उपकेंद्र कार्यरत आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र, कडाव अंतर्गत ७ उपकेंद्र असून सदर माता उपकेंद्र भालीवडी अंतर्गत लाखाचेवाडी येथील होती. सदर उपकेंद्रात आरोग्य सेविका/सेवक व आशा मार्फत आरोग्यसेवा व योग्य ते उपचार पुरविले गेले होते. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, कडाव येथे संदर्भसेवा देण्यात येत आहे.

(४) उक्त प्रकरणी जिल्हास्तरीय गठीत समितीव्दारे दि.२२/०४/२०२५ रोजी प्राथमिक चौकशी करण्यात आली असून त्यानुसार सदर गर्भवती महिलेस आवश्यक ते सर्व उपचार देण्यात आले होते. तसेच पुढील उपचाराबाबत समुपदेशनही करण्यात आले होते.

ग्रामिण भागातील गर्भवती माता व नवजात बालकांसाठी आरोग्य विषयी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना खालीलप्रमाणे आहेत.

१. प्रत्येक गरोदर मातेची पोर्टलाला नोंद घेऊन मातेच्या भेटी पुर्ण होण्यासाठी आणि तपासण्या व उपचार देण्यासाठी पाठपुरावा करण्यात येतो. गरोदर मातेस धनुर्वात लस, लोहयुक्त व कॅलशियमच्या गोळया, रक्त तपासण्या,मोफत सोनोग्राफी या सेवा आरोग्य केंद्रामध्ये दिल्या जातात.

२. प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानांतर्गत सर्व गरोदर महिलांची निश्चित केलेल्या तारखांना तपासणी करुन त्यामध्ये आढळून आलेल्या अतिजोखमिच्या मातांना आवश्यकतेनुसार औषधोपचार देऊन संदर्भित केले जाते.

३. जननी सुरक्षा कार्यक्रमांतर्गत प्रसुतीकरिता रुग्णवाहिका क्र. १०२ व १०८ मोफत उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच अनुसूचित जाती / जमाती व दारिद्रय रेषेखालील मातांना घरी प्रसुती झाल्यास रु. ५००/-, शासकीय व नोंदणीकृत दवाखान्यात प्रसुती झाल्यास रक्कम रु ७००/- तसेच सिझरिअन प्रसूती झाल्यास रु. १५००/- असा लाभ देण्यात येतो.

४. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेअंतर्गत पहिल्या खेपेच्या पात्र मातेला दोन टप्प्यांमध्ये रु. ५०००/- तर दुसरे अपत्य मुलगी असल्यास प्रसूतीनंतर एका टप्प्यामध्ये रु. ६०००/- मोबदला दिला जातो.

५. मानव विकास कार्यक्रमांतर्गत शिबीरांचे आयोजन करुन गरोदर व स्तनदा मातांची मोफत तपासणी करुन औषधोपचार करण्यात येतो. अनुसूचित जाती/जमाती व दारिद्रय रेषेखालील गरोदर महिलांना बुडित मजूरीपोटी रक्कम रु. २०००/- व प्रसूती झाल्यानंतर रक्कम रु. २०००/- असे एकूण रक्कम रु. ४०००/ चा लाभ देण्यात येतो.

६. मातृत्व अनुदान योजनेअंतर्गत नवसंजिवनी क्षेत्रातील सर्व अनुसूचित जमाती गारोदर मातांना ४००/- इतके मातृत्व अनुदानाचा लाभ देण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील एच.डी. एंटरप्रायजेस व गौरव जॉइंट वेंचर प्रा.लि. या कंपनीतील कामगारांना कामावरुन कमी केल्याबाबत

(११) * ९७१० श्री.संजय देरकर (वणी) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील एच.डी. एंटरप्रायजेस व गौरव जॉइंट वेंचर प्रा.लि. या कंपनीत काम करणाऱ्या तब्बल ६५ कामगारांना माहे जानेवारी, २०२५ मध्ये अचानक कामावरुन कमी करण्यात आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामगारांना कामावरुन अचानक काढल्याने कामगारांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली असून कामगारांना पुन्हा कामावर रुजू करण्यात यावे या मागणीसाठी कामगारांनी कंपनीच्या गेटसमोर दिनांक २७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारापासून बेमुदत उपोषण सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने उक्त कामगारांवर बेरोजगारीची व त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ येऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर : (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी चौकशी केली असता असे आढळून आले की, मुख्य आस्थापना वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (डब्ल्यू.सी.एल.) ही असून, मे. एच.डी. एंटरप्रायजेस, कच्छ, भुज (गुजरात) व गौरव कॉन्ट्रॅक्ट कंपनी, कच्छ, भुज (गुजरात) या त्यांचे अधिनस्त कंत्राटदार आहेत. सदर आस्थापनांवरील समुपयुक्त नियंत्रण केंद्र शासनाच्या अखत्यारीत येत असल्याने, उपोषणकर्त्या कामगारांना त्यांच्या कायदेशीर मागण्यांसाठी सहाय्यक कामगार आयुक्त (केंद्रीय), चंद्रपूर यांच्याकडे रितसर तक्रार दाखल करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

गुलिएन बॅरे सिंड्रोम (जिबीएस) या आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

(१२) * ७६३३ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात गुलिएन बॅरे सिंड्रोम (जिबीएस) या आजाराचा प्रादुर्भाव दिसून आल्याने राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेच्या (NIV) प्राथमिक संशोधनात कोंबड्यांमधून "कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी" या जिवाणूचा संसर्ग झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला असून खडकवासला धरण परिसरातील कुक्कुटपालन केंद्रांतील विष्ठा, रुग्णांचे रक्त व पाण्याचे नमुने तपासले असता ३०–३५% नमुन्यांमध्ये "कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी" आढळल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याअनुषंगाने कुक्कुटपालन केंद्रांतील साफसफाई, बायोसेफ्टी उपाययोजना, जंतूनाशक फवारणी व पशुसंवर्धन परवाना अटींचे पालन याचे संपूर्ण पुर्नवलोकन करण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, या आजाराच्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर NIV सध्या २६ विविध संभाव्य कारणांचा शोध घेत असून त्यातील महत्त्वपूर्ण निष्कर्ष शासनाच्या विचाराधीन आहेत काय, तसेच या संशोधनाचा अंतिम अहवाल कधीपर्यंत अपेक्षित आहे,

(४) तसेच, काही नमुन्यांमध्ये नोरोव्हायरसही आढळल्याचे नमूद करण्यात आले असल्याने पाणीप्रदूषण व कुक्कुटपालन व्यवस्था यामधील संभाव्य संबंधाची चौकशी आरोग्य विभागाकडून करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने माहिती घेऊन वाढते तापमान, प्राणी-माणूस संपर्क व स्थलांतरित पक्ष्यांच्या संदर्भात भावी साथींचा धोका लक्षात घेता NIV सारख्या संस्थांच्या सहकार्याने दिर्घकालीन साथरोग प्रतिबंध योजना आखण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे अंशत: खरे आहे.

गुलिएन बॅरे सिंड्रोम (जिबीएस) हा ऑटो-इम्यून डिसऑर्डर दुर्मिळ आजार आहे. जिथे शरीराची रोगप्रतिकारक प्रणाली मज्जासंस्थेवर हल्ला करते. स्नायूमध्ये कमकुवतपणा येतो. हा आजार विविध विषाणू किंवा जिवाणू यांच्या संसर्गानंतर होऊ शकतो. कँपायलोबॅक्टर जेजूनी या जिवाणुचा संसर्ग हे त्यापैकी एक कारण असू शकते. तथापि या आजाराचे निश्चित कारण ज्ञात नाही.

पुणे जिल्ह्यात GBS आजाराचे दि.०२/०४/२०२५ अखेर एकूण २०८ रुग्ण आढळून आले. त्यामध्ये पुणे महानगर पालिकेचे १२२, पिंपरी चिंचवड महानगर पालिकेचे ३४, पुणे ग्रामीण भागाचे ३७ व इतर जिल्ह्यातील १५ रुग्ण आढळून आले होते. संबंधित सर्व विभागाने त्यात सार्वजनिक आरोग्य विभाग, पशुसंवर्धन विभाग, पाणीपुरवठा विभाग, अन्न व औषधी प्रशासन विभाग आणि पुणे महानगरपालिका यांनी संयुक्तपणे आवश्यक ती कार्यवाही केल्यामुळे सदरचा उद्रेक २ ते ३ महिन्यात आटोक्यात आणण्यात यश आले आहे.

• गुलिएन बॅरे सिंड्रोम उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर खडकवासला परिसरातील ११ कुक्कुट प्रक्षेत्रातील विविध प्रकारचे एकूण १०६ नमुने (यांमध्ये पक्षांचे क्लेएकल स्वॅब-८९, पक्षांचे विष्ठा-१७) व कुक्कुट फार्म मध्ये विविध पाणी स्त्रोतांचे २९ नमुने असे एकुण १३५ नमुने तपासणीसाठी आय.सी.एम.आर. राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थान पुणे यांच्याकडे पाठविण्यात आले हाते. पक्षांचे १०६ नमुन्यांपैकी २४ नमुने (यांमध्ये पक्षांचे क्लोएकल स्वॅब-२२, पक्षांचे विष्ठा -०२) हे कँपायलोबॅक्टर जेजूनी या जिवाणूसाठी होकारार्थी आले आहेत.

• रुग्णांच्या रक्त नमुने तपासणी अहवालामध्ये ८९६ रक्त नमुने तपासण्यात आले. सदर नमुने कँपायलोबॅक्टर जेजूनी या जिवाणूसाठी नकारार्थी आले आहेत. मानवी विष्ठेच्या १४८ नमुन्यापैकी १४ नमुने कँपायलोबॅक्टर जेजूनी या जिवाणूसाठी होकारार्थी आले आहेत.

• प्रभावग्रस्त भागातील पिण्याच्या पाण्याचे २०८ नमुने घेण्यात आले त्यापैकी १ मध्ये कँपायलोबॅक्टर जेजूनी जिवाणुसाठी होकारार्थी निष्कर्ष आला आहे.

(२) ज्या फार्ममध्ये कँपायलोबॅक्टर जेजूनी चा नमुना होकारार्थी आला अशा ठिकाणी खबरदारीचा उपाय म्हणुन निर्जंतुकीकरण व फवारणी करण्यात आली आहे. तसेच, परिसरातील इतर कुक्कुटपाल प्रक्षेत्रांवर साफसफाई, जंतुनाशकाची फवारणी नियमित करण्यात येत असून खबरदारीचा उपाय म्हणून पशुवैद्यकीय दवाखाना मार्फतही जंतूनाशक फवारणी करुन परिसर निर्जंतुकीकरण करण्यात आला आहे. तसेच सर्व कुक्कुट फार्मावर जैव सुरक्षा नियमांचे पालन करण्याबाबतही कार्यवाही केली आहे.

(३) विविध विषाणु किंवा जिवाणु याच्या संसर्गानंतर दोन ते तीन आठवडयानंतर काही रुग्णांना हा आजार उदभवू शकतो. त्यामुळे बरेचदा या आजाराची सुरुवात नेमक्या कोणत्या संसर्गाने झाली ते विसरले जाते. ५० टक्क्यांहुन अधिक प्रकरणामध्ये वैज्ञानिकदृष्टया नेमके कारण शोधणे अवघड असते.

(४) हे अंशत: खरे आहे.

२०८ पाण्याच्या नमुन्यांपैकी ८ नमुन्यांमध्ये नोरोव्हायरस या विषाणुसाठी होकारार्थी निष्कर्ष आला आहे.

सदर आजाराचा प्रादुर्भाव झाल्यानंतर RRT (शीघ्र प्रतिसाद दल) बनविण्यात आले, त्यात सार्वजनिक आरोग्य विभाग, पशुसंवर्धन विभाग,पाणीपुरवठा विभाग, अन्न व औषधी प्रशासन विभाग आणि पुणे महानगरपालिका यांचा समावेश होता. पशुसंवर्धन विभाग, पाणीपुरवठा विभाग, अन्न व औषधी प्रशासन विभाग आणि पुणे महानगरपालिका यांना

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत बाधित भागातील पाणी, खादयपदार्थ व स्वच्छता सेवा याबाबत आवश्यक त्या उपाययोजना तात्काळ हाती घेण्याच्या सुचना देण्यात आल्या त्याप्रमाणे त्या सर्व विभागांनी कार्यवाही केली. आंतरविभागीय समन्वयाने काम केल्यामुळे ही साथ तीन महिन्यात नियंत्रणात आणण्यात शासनास यश मिळाले.

(५) यासंदर्भात संबंधित विभागांचा समावेश असलेली संसर्गजन्य आजार प्रतिबंध व नियंत्रणासाठी उच्च स्तरीय समिती दि.२६/०८/२०२४ च्या शासन निर्णयान्वये पुनर्गठित करण्यात आली आहे, या समितीमार्फत अशी प्रकरणे उदभवल्यास आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते. याशिवाय केंद्रशासनाकडुन नविन "ONE HEALTH" धोरण निश्चित केले जात असुन त्या चर्चासत्रात राज्य शासनाने सहभाग नोंदविला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

शिरूर का. (जि.बीड) तालुक्यातील विकास कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

(१३) * **१०२१८ श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरूर का. (जि.बीड) तालुक्यातील १) सांगळवाडी ते दत्त मंदिर २) जांब ते खांबा ३) कारेगाव ते येवलवाडी, ४) शिरापुर गात ते फुलसांगवी,५) रामा ५९ ते तागडगाव, ६) खोकरमोहा ते तागडगाव, ७) खोकरमोहा ते खालापुरी, ८) पाडळी ते ढोकवड, ९) पौंडुळ क्र.२ ते पौंडुळ क्र.३, १०) लिंबा ते पौंडुळ, ११) जांब ते ढोकवड, १२) तागडगाव ते पाडळी, १३) रामा ६३ ते ढोकवड, १४) खोकरमोहा खंडोबावस्ती ते खालापुरी

रस्ता या रस्त्यांची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची करण्यात आल्याच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त सर्व कामांची चौकशी स्तरनिहाय अथवा त्रयस्थ समितीमार्फत गुणनियंत्रण विभागाच्या वतीने करण्याची मागणी संबंधित लोकप्रतिनिधी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर व जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक २१ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे : (१) (२) व (३) बीड विधानसभा मतदार संघातील शिरुर का. तालुक्यातील सदर एकूण १४ कामांपैकी ८ कामे पूर्ण झाली असून उर्वरित ६ कामे अद्याप सुरु झालेली नाहीत.

मा.लोकप्रतिनिधी यांच्या तक्रारीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी दि.०३.१०.२०२४ रोजीच्या आदेशान्वये जिल्हा परिषद, बांधकाम विभाग अंतर्गत पूर्ण झालेल्या प्रत्येक कामाची त्रयस्त समितीमार्फत गुणनियंत्रणाबाबत तपासणी करण्यासाठी तालुकानिहाय राज्य गुणवत्ता निरीक्षक (SQM) यांची नियुक्ती केलेली आहे. त्यानुसार मंजूर काम भौतिकदृष्ट्या पूर्ण झाल्यानंतर सर्वप्रथम त्या कामाची संबंधित राज्य गुणवत्ता निरीक्षक यांचेकडून तपासणी होऊन तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच संबंधित कामाचे देयक अदा करण्याबाबत जिल्हा परिषदेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्हयातील काही गावांत अशुध्द पाणी पुरवठा होता असल्याबाबत

(१४) * ८६९२ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयात भूजल सर्वेक्षण विभागाने पाण्याच्या नैसर्गिक स्त्रोताचे नमूने तपासले असता २१ हजार नमुन्यांपैकी ३९३ नमुन्यांनमध्ये फ्लोराईड असल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरपना (जि.चंद्रपूर) येथे दुषित पाण्याचे प्रमाण सर्वाधिक असून नायट्रेटचे ७५५ तसेच क्षार बाधित १०० नमुन्यांची नोंद झाली असून त्यामुळे हाडे वाकण्यासारखे आजार उद्भवत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चंद्रपूर जिल्हयातील ५९८ गावातील पाणी पिण्यास अयोग्य आहे तसेच लोहखनिज बाधित ६ तर जिवाणू बाधित ३१६ नमुने आढळले असल्याचे अहवालातून समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील : (१) अंशत: खरे आहे.

सन २०२४-२५ या वर्षात चंद्रपूर जिल्ह्यात भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांचे मार्फत रासायनिक दृष्ट्या ४५४४ व जैविकदृष्ट्या ७७१३ पाणी नमुन्यांचे परीक्षण करण्यात आले आहे. त्यामध्ये रासायनिक घटकांनी प्रदूषित

असलेले ११७ व जैविक घटकांनी प्रदूषित असलेले १८२ नमुने आढळून आले आहेत. तसेच ०५ गावातील ०६ नमुने फ्लोराईड बाधित असल्याचे आढळून आले आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

कोरपना तालुक्यात १०३ गावातील ४१५ पाणी नमुन्यांचे पृथ्थकरण करण्यात आले. त्यापैकी गावे मौजा पिपरी, व मौजा लोणी या दोन गावातील पाण्याचे स्रोत नायट्रेट बाधित असल्याचे आढळून आले आहे. क्षारबाधित स्रोत आढळून आले नाही.

तीन पाणी नमुन्यात फ्लोराईड चे प्रमाण १ PPM पेक्षा जास्त आढळून आले आहे. तसेच ६ फ्लोरोसीसचे रुग्ण सापडले व त्यांच्या मुत्रातील फ्लोराईडचे प्रमाण १ PPM ते २.०१ PPM च्या दरम्यान आहे. सदर बाधित रुग्णांना सांधे दुखीचा त्रास असून त्यांची हाडे वाकलेली असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) अंशत: खरे आहे.

सन २०२४-२५ या वर्षात चंद्रपूर जिल्ह्यात भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांचे मार्फत रासायनिक दृष्ट्या ४५४४ व जैविकदृष्ट्या ७७१३ पाणी नमुन्यांचे परीक्षण करण्यात आले आहे. त्यामध्ये रासायनिक घटकांनी प्रदूषित असलेले ११७ व जैविक घटकांनी प्रदूषित असलेले १८२ नमुने आढळून आले आहेत. लोहखनिज बाधित स्रोत आढळून आला नाही.

(४) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली असून खालील प्रमाणे प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत.

• जैविक घटकांनी प्रदूषित असलेल्या १८२ स्रोतांचे क्लोरीनेशन करून पुर्नतपासणी करण्यात आली असता सर्व १८२ नमुने योग्य असल्याचे आढळून आले आहे.

• रासायनिक घटकांनी प्रदूषित असलेले ११७ स्रोतामधील पाणी पिण्यास बंद करण्यात आले असून, सदर बाधित गावांना अन्य स्रोताव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

• फ्लोराईड बाधित ०५ गावांपैकी ०२ गावात जलशुध्दीकरण सयंत्र (R.O.) उपलब्ध आहेत, व ०२ गावात जुनी नळ योजना उपलब्ध आहे. त्यापैकी १ योजनेतुन जल शुद्धीकरण सयंत्रा व्दारे (WTP) पाणी पुरवठा केला जात आहे. व उर्वरीत एका गावात पर्यायी शुध्द पाण्याचे स्रोत उपलब्ध आहेत.

• रासायनिक घटकांनी बाधित ११७ नमुने असलेल्या ६४ गावांमध्ये एकूण ५७६ स्रोत उपलब्ध आहेत. ११७ बाधित स्रोत वगळता उर्वरीत ४६० पर्यायी स्रोत पिण्यास योग्य आहेत त्याव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तसेच १८२ जैविक बाधित नमुने असलेल्या ७३ गावांमध्ये क्लोरीनेशन करून पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

• अशा एकुण १३७ गावांमध्ये जल जीवन मिशन अंतर्गत कायम स्वरुपी पिण्याच्या पाण्याच्या योजना घेण्यात आल्या असून या योजनांची कामे प्रगती पथावर आहेत.

• भूमीगत पिण्याच्या पाण्याचे स्रोत साधारणता नैसर्गिक कारणामुळे, औद्योगिक करणामुळे व शेतीमध्ये रासायनिक खते व औषधांचा मोठ्या प्रमाणात वापर या व अन्य कारणांमुळे दुषित होत असल्याचे आढळून येतात. याबाबत आवश्यक उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने कृषी विभाग, उद्योग विभाग व पर्यावरण विभागास कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

परतूर (जि.जालना) येथे ग्रीड पाणीपुरवठा योजनेंतर्गत कामात झालेला गैरव्यवहार

(१५) * १२९९१ श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परतूर (जि.जालना) येथे करण्यात आलेल्या १७३ व ९५ गावे ग्रीड पाणीपुरवठा योजनेंर्गतील कामात सुमारे २६ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजना आर्थिक व भौतिक स्वरुपात पूर्ण झालेली नसताना ही योजना पूर्ण झाल्याचा खोटा अहवाल संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाकडे पाठविला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेच्या कामात हायड्रोलिक टेस्ट पूर्ण न करणे, पाईपलाईनची आवश्यकतेनुसार खोदाई न केल्याने मोठ्या प्रमाणात पाणी गळती होणे, पाणी फिल्टर न करता पुरवठा करणे यासंदर्भातील खोदकामांमुळे पाईपलाईनचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे अशा प्रकारच्या अनेक त्रुटी निदर्शनास आल्या, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर ग्रीड पाणीपूरवठा योजनेमधील काम पूर्ण न करता प्रत्येकी रु.१३ कोटी प्रमाणे र.२६ कोटी रुपयांची देयके कोणतीही शहानिशा न करता अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, देयके अदा करुनही अद्याप या गावांना पाणी पुरवठा होत नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करुन संबंधितांविरुध्द कारवाई करण्याच्या लेखी तक्रारीची मागणी करुनही अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन सदर ग्रीड पाणीपुरवठा योजना क्षमतेने कार्यान्वित करणेबाबत तसेच यातील दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

१७३ गावे ग्रीड पाणी पुरवठा योजना ही भौतिक दृष्टया पूर्ण झालेली आहे. तसेच ९५ गावे ग्रीड पाणी पुरवठा ही भौतिक दृष्टया पूर्ण न झाल्यामुळे योजनेतील अपूर्ण कामाची रक्कम अंतिम देयकामध्ये राखुन ठेवण्यात आली आहे.

१७३ गावे व ९५ गावे ग्रीड पाणी पुरवठा योजनेचे लेखेजोखे अद्यापपर्यंत बंद केलेले नसल्यामुळे या दोन्ही योजना आर्थिकदृष्टया पूर्ण झालेल्या नाहीत.
(३) हे अंशत: खरे आहे.

सदर योजनेतील बऱ्याच पाईपलाईनची जलदाब चाचणी घेण्यात आली असून उर्वरीत काही पाईपलाईनची जलदाब चाचणी घेण्यात आली नसल्यामुळे ९५ गावे ग्रीड पाणी पुरवठा योजनेच्या अंतिम देयकामध्ये सदर कामांची रक्कम राखून ठेवण्यात आलेली आहे.
(४) हे खरे नाही.
(५) हे अंशत: खरे आहे.

१७३ गावे व ९५ गावे ग्रीड पाणी पुरवठा योजनेमधून पाणी पुरवठा सुरु असून काही गावांना रस्ता रुंदीकरण, शेतकऱ्यांनी केलेली पाईपलाईनची तुटफूट, इतर शासकीय विभागामार्फत टाकण्यात आलेल्या केबलमुळे झालेली तुटफूट इ. कारणांमुळे काही गावांना पाणी पुरवठा करताना अडथळा निर्माण होत असून सद्य:स्थितीत या दोन्ही योजनेतून बहुतांश गावांना पाणी पुरवठा सुरुळीतपणे सुरु आहे.
(६) व (७) हे खरे नाही.

सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांनी नेमणूक केलेल्या चौकशी समितीमार्फत योजनेशी संबंधित तत्कालीन प्रभारी कार्यकारी अभियंता, उपअभियंता, सहाय्यक अभियंता यांना निलंबित करुन त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

राज्यातील शहरी भागात सुरु असलेल्या अनधिकृत खाजगी वसतिगृहावर कारवाई करणेबाबत

(१६) * ७९०३ श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.राजेश विटेकर (पाथरी) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शहरी भागात नोंदणीविना अनधिकृत खाजगी वसतिगृहे सर्रासपणे सुरु असून येथे राहणाऱ्या मुलांची मानसिक, शारीरिक, लैंगिक व आर्थिक पिळवणूक होते तसेच येथे रहाणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंदही नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा वसतिगृहावर जिल्हा प्रशासन, शिक्षण तसेच महिला आणि बाल विकास विभागासह कोणाचेही नियंत्रण नसल्याने विद्यार्थी आवश्यक सुविधा व सुरक्षेपासून वंचित रहात असून अशा अनधिकृत खाजगी वसतिगृहांची तपासणी करण्याचे आदेश आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांनी सन २०२५ मध्ये काढले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाल न्याय अधिनियम, २०१५ व २०२१ मधील तरतूदी प्रमाणे अशा खाजगी वसतिगृहातील मुलांच्या अधिकारांचे व न्याय हक्काची पायमल्ली होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अनधिकृत खाजगी वसतिगृहावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) महिला व बाल विकास विभागाच्या दि. १/७/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाच्या कोणत्याही विभागाच्या अखत्यारीत न येणाऱ्या वसतिगृहातील / संस्थांमधील विद्यार्थ्यांना योग्य प्रमाणात सोयी सुविधा न पुरविणाऱ्या, मुलांच्या हक्काचे संरक्षण न करणाऱ्या विद्यार्थ्यांचे शारिरिक, मानसिक, सामाजिक आर्थिक शोषण करणारे वसतिगृह / संस्थांवर कारवाई करण्याचे अधिकार संबंधित स्थानिक स्वराज्य प्रशासनास देण्यात आले आहेत. तसेच, अशा प्रकारच्या संस्थांमध्ये बाल न्याय अधिनियम ,२०१५ च्या कलम २ (१४) नुसार काळजी व संरक्षणाची गरज असल्याचे निदर्शनास आल्यास सदर बालकांची माहिती स्थानिक स्वराज्य संस्थेने संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी व जिल्हा बाल कल्याण समितीस देण्याचे स्थानिक स्वराज्य संस्थेस बंधनकारक करण्यात आले आहे.

तसेच संपुर्ण राज्यामध्ये विना परवानगी कोणतेही बालगृह, अनाथाश्रम अथवा वसतिगृह चालविणे अनधिकृत असल्याचे आयुक्तालय, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांच्यामार्फत निवेदन प्रसिध्द करुन त्यामध्ये दंडात्मक कारवाई करण्याचे नमूद करण्यात आलेले आहे. तसेच अशा अनधिकृत संस्था निदर्शनास आल्यास तात्काळ जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयास संपर्क साधणे बाबत सर्व जनतेला आव्हान करण्यात आलेले आहे.

तसेच राज्यातील बालकांच्या अनधिकृत संस्थाविरोधात कठोर कारवाई करण्याबाबत आयुक्त, महिला व बाल विकास पुणे यांच्या दि. १६/४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये पोलीस महासंचालक मुंबई, सर्व पोलीस आयुक्त, सर्व पोलीस अधिक्षक यांना कळविण्यात आले आहे.

याव्यतिरिक्त धर्मदाय आयुक्त, पुणे यांना आयुक्तालयाचे दिनांक २५/३/२०२५ च्या पत्रान्वये अनधिकृत बालगृह, वसतिगृहांच्या मान्यता रद्द करणे बाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच, विभागामार्फत कार्यरत असलेले

सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी (जिल्हा परिषद) आणि बाल विकास प्रकल्प अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सर्व यांना सुध्दा अनधिकृत बालगृहे वसतिगृहांचा शोध घेवून त्यांचेवर कार्यवाही करणे बाबतच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा विलंब झालेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

आईस लाईन रेफ्रिजरेटर (आय.एल.आर.) आणि डिप फ्रिजर खरेदीत झालेला गैरव्यवहार

(१७) * १०९७४ डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक आरोग्य विभागातील आईस लाईन रेफ्रिजरेटर (आय.एल.आर.) आणि डिप फ्रिजर खरेदीत तब्बल रुपये ६३ कोटीं इतक्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निविदाधारकांमध्ये खुली स्पर्धा होता बाजारभावापेक्षा दुपटीने आणि तिपटीने आय.एल.आर. आणि डीप फ्रीजरची अनुक्रमे रु.३३ आणि रु.३० कोटी रुपयांची खरेदी करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गव्हर्मेंट ई मार्केट प्लेस वरील दर आणि इतर राज्यांना गोदरेज आणि वोल्टास कंपनीने सादर केलेले दर प्राप्त दरांपेक्षा कमी असून सार्वजनिक आरोग्य विभागाला सादर केलेले दर जास्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधित दोषी अधिकारी कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
आय.एल.आर. आणि डिप फ्रिजर करिता दोन स्वतंत्र ई-निविदा mahatender.gov.in या प्रणालीवर स्पर्धात्मक पद्धतीने करण्यात आलेल्या असून, Ice Line Refrigarator (small,large आणि Deep freezer, large) मध्ये प्राप्त L1 दर अंदाजित दरापेक्षा कमी आहे.
(३) हे खरे नाही.
निविदा प्रक्रियेअंती प्राप्त आय.एल.आर.व डिप फ्रिजर यांचे न्यूनतम दर हे निविदेतील तांत्रिक विनिर्देशानुसार केंद्र शासनाच्या Gem पोर्टल वर उपलब्ध असणाऱ्या दरांपेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आले.
(४) या प्रकरणी आयुक्त ,आरोग्य सेवा, मुंबई यांच्या स्तरावर चौकशी करण्याचा निर्णय खरेदी समितीच्या बैठकी मध्ये घेण्यात आलेला असून सदर प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मेळघाटातील आरोग्य विभागात होत असलेला गैरव्यवहार

(१८) * ९००७ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राजन नाईक (नालासोपारा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाटातील आरोग्य विभागात बंद जनरेटर सुरु असल्याचे दाखवून लाखो रुपयांची डिझेलची खोटी देयके काढण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, चिखलदरा तालुक्यातील सलोना, सेमाडोह, काटकुंभ व हतरु प्राथमिक आरोग्य केंद्रात जनरेटरसाठी डिझेलची बनावट देयके तयार करुन पेट्रोलपंप संचालकाची जवळपास रु.२६ लाखा इतक्या रुपयांची थकबाकी आरोग्य विभागाकडे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेळघाटातील रुग्णवाहिका आदिवासी रुग्णांना वेळेवर मिळत नसल्याच्या शेकडो तक्रारी येत असून नागपूर व तळेगांव दशासर येथे बदलीपात्र डॉक्टर व कर्मचाऱ्यांचे घरगुती साहित्य नेण्यासाठी रुग्णवाहिकेचा वापर झाल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्याअन्वये सर्व संबंधित दोषी कर्मचारी व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे अंशत: खरे आहे.

मेळघाटातील आरोग्य संस्थेमधील उपलब्ध जनरेटर सुरु आहेत. मात्र चालवलेले तास आणि वापरलेले डिझेल यात काही ठिकाणी तफावत आढळून आली होती. त्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीने चौकशी अहवाल जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना दिनांक २४/०६/२०२५ रोजी सादर केला असून सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

पेट्रोलपंप संचालकांनी जि. प. आरोग्य विभाग, अमरावती यांच्याकडे रु.२६ लाख रुपयांची थकबाकीची मागणी केलेली नाही वा तशी बिले प्रलंबित नाहीत.

(३) हे खरे नाही.

आदिवासी रुग्णांना रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करुन देण्यात येते.

(४) दैनिक लोकमत या वृत्तपत्रामध्ये दि.१५/०४/२०२५ रोजी प्रकाशित झालेल्या बातमीच्या अनुषंगाने जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती या कार्यालयाने दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, मेळघाट क्षेत्र यांना सदर प्रकरणी चौकशी करुन अहवाल तात्काळ सादर करणेबाबत कळविले असता, तालुका वैद्यकीय अधिकारी यांनी अहवाल सादर केलेला असून त्यामध्ये नमूद केल्यानुसार सदर प्रकरणी कोणीही अधिकारी व कर्मचारी दोषी नसल्याचे आढळून आल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील महिलांमध्ये कर्करोगाचे प्रमाण वाढत असल्याबाबत

(१९) * १३०७६ श्री.रविशेठ पाटील (पेण), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात आलेल्या "संजीवनी अभियान" अंतर्गत महिलांमध्ये मुखाचा, गर्भाशयाचा, व स्तनांचा कर्करोग हे आजार मोठया प्रमाणात वाढत असल्याची बाब माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच अभियानामार्फत दिनांक ८ मार्च, २०२५ रोजी पासून केलेल्या सर्व्हेमध्ये एकटया हिंगोली जिल्ह्यात ३ लाखांपैकी २० हजार महिलांना कर्करोग झाला असल्याची माहिती समोर आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिवसेंदिवस महिलांमध्ये वाढत्या कर्करोगाचे प्रमाण पाहता राज्यातील फक्त महिलांसाठी स्वतंत्र "कर्करोग रुग्णालय" उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे खरे नाही .

संजीवनी अभियान हे कर्करोगाच्या Screening व निदान यामध्ये वाढ करण्यासाठी हिंगोली जिल्ह्यातील स्थानिक पातळीवर राबविण्यात आले.

(२) हे खरे नाही.

ग्रामीण भागातील महिलांमध्ये गर्भाशयमुख व स्तनाचा कर्करोग या आजाराबाबत जागरुकतेचा अभाव असल्याने हिंगोली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी लवकर निदान व लवकर उपचार या संकल्पनेतून दि. ८ मार्च, २०२५ रोजी संजीवनी अभियान सुरु केले.

संजीवनी अभियानांतर्गत आशा कार्यकर्तीमार्फत कर्करोग आजाराच्या लक्षणाबाबत प्रश्नावली तयार करण्यात येऊन या प्रश्नावलीच्या आधारे हिंगोली जिल्ह्यामधील ३० वर्षावरील एकूण २,९२,९९६ महिलांचे सर्वेक्षण करुन एकूण १४,५४२ कर्करोग संशयित महिलांची यादी तयार करण्यात आली. सदर संशयित महिलांचे वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत पुढील Screening व चाचणी करण्यात आली असून अद्यापपर्यंत ३ महिलांना गर्भाशयमुख कर्करोग,१ महिलेला स्तन कर्करोग व ८ रुग्णांना मुख कर्करोग असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) महिलांसाठी स्वतंत्र कर्करोग रुग्णालय उभारण्याबाबत कार्यवाही प्रस्तावित नाही. तथापि, कर्करोग रुग्णासाठी खालीलप्रमाणे उपचार व आरोग्य सेवा उपलब्ध आहेत-

१. कर्करोग प्रतिबंधासाठी आणि वेळीच निदान करण्यासाठी शासकीय रुग्णालयात तसेच उपकेंद्र व गावपातळीपर्यंत Screening करण्यात येते. तसेच Screening साठी मोहीमा राबविण्यात येतात.

२. निदानात्मक सुविधा या जिल्हा रुग्णालये, महिला रुग्णालये, वैदयकीय महाविदयालये, MJPJAY अंतर्गत नामांकीत संस्था येथे उपलब्ध आहेत.

३. त्याचप्रमाणे Cancer Warrior (TMH मधील प्रशिक्षीत खाजगी तज्ञ) हे ११ जिल्हयांतील रुग्णालयात महिन्यातून दोनदा तज्ञ सुविधा उपलब्ध करुन देतात.

४. तसेच, राज्यातील ८ जिल्हा रुग्णालयात Day Care Chemotherapy Centre सुरु आहेत. तसेच सर्व जिल्हयात Day Care Centre कार्यान्वित करणेबाबत प्रकीया सुरु आहे.

५. त्याचप्रमाणे, नाशिक व अमरावती येथे संदर्भ सेवा रुग्णालयात संपूर्ण कर्करोग निदान व उपचार सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात साथ रोगांचा प्रादुर्भाव कमी करण्याच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजना

(२०) * ९०२४ श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.श्याम खोडे (वाशिम), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या तीन महिन्यांत मलेरियाचे १,१३८, डेंग्यूचे ८१२ व चिकनगुनियाचे ५०७ रुग्ण आढळले असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शहरी भागातील सार्वाधिक रुग्ण मुंबई महानगरपालिका क्षेत्रात आढळलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, वाशिम जिल्ह्यात मागील पाच महिन्यांत ११ डेंग्यू रुग्णांची नोंद झाली असून सिंधुदुर्ग, पालघर, पुणे, रत्नागिरी या जिल्ह्यांत चिकुनगुनियाचे सर्वाधिक रुग्ण आढळून आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन साथ रोगांचा प्रादुर्भाव कमी करण्याच्या दृष्टीने कोणत्या उपायोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे खरे आहे,

राज्यात मार्च २०२५ अखेर -

- हिवतापाचे एकूण २०९७ रुग्ण
- डेंग्यूचे एकूण ११५९ रुग्ण
- चिकुनगुनियाचे एकूण ५९२ रुग्ण आढळून आले आहेत.

(२) हे खरे आहे.

राज्यातील शहरी भागातील विशेषतः मुंबई महानगरपालिका क्षेत्रात माहे मार्च, २०२५ अखेर आढळून आलेली रुग्ण संख्या खालील प्रमाणे..

	एकुण शहरी विभाग	मुंबई महानगरपालिका	मृत्यू
हिवताप	१२८५	१०२०	०
डेंग्यू	५६६	२२१	०
चिकुनगुनिया	२५२	९४	०

उपरोक्त आकडेवारीवरुन असे दिसून येते की, मुंबई महानगरपालिका क्षेत्रात हिवताप रुग्णसंख्येत वाढ झाली आहे.

(३) हे अंशत: खरे आहे,

वाशिम जिल्ह्यात मागील पाच महिन्यात आढळून आलेले डेंग्यू रुग्ण खालीलप्रमाणे :-

जिल्हा/ महिना	२०२२	२०२३	२०२४	२४-२५ मागील पाच महिन्यातील डेंग्यू रुग्ण				
				नोव्हें.	डिसें.	जाने.	फेबु.	मार्च.
वाशिम	३३	८५	११८	८	१४	१	२	३

मागील पाच महिन्यात सिंधुदुर्ग, पालघर, पुणे, रत्नागिरी या जिल्ह्यात खालील प्रमाणे चिकुनगुनियाचे रुग्ण आढळून आले आहेत :-

जिल्हा/ महिना	२०२२	२०२३	२०२४	२४-२५ मागील पाच महिन्यातील चिकुनगुनिया रुग्ण				
				नोव्हें.	डिसें.	जाने.	फेबु.	मार्च
पुणे	१६९	१२१	२६९	५७	३८	१२	३५	२०
रत्नागिरी	०	०	०	०	०	०	०	०
पालघर	२	०	३१	२१	३०	१६	१०	१३
सिंधुदुर्ग	२२	६६	०	०	०	०	५	३८

उपरोक्त आकडेवारीवरुन असे दिसून येते की, रत्नागिरी वगळता इतर ३ जिल्ह्यांमध्ये रुग्णसंख्या वाढलेली दिसून येत आहे.

(४) होय, शासनामार्फत साथ रोगांचा नियमितपणे आढावा घेण्यात येतो.

• मान्सून पूर्व तयारी, साथरोगांची सद्यस्थिती याबाबत मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली दि.१२/०६/२०२५ रोजी बैठक घेण्यात आली. तसेच, केंद्र शासनामार्फत दि.०२/०७/२०२५ रोजी डेंग्यू संसर्ग नियंत्रण याविषयी आढावा बैठक घेण्यात आली.

• शासनाने तपासणी आणि गृहभेटींची संख्या यंदा लक्षणीय वाढवली आहे. त्यामुळे एकूण रुग्णसंख्येत वाढ दिसत असली तरी प्रत्यक्षात गंभीर रुग्णांचे प्रमाण आणि मृत्यूदर यामध्ये घट झाली आहे. हे शासनाच्या सक्रियतेचे निदर्शक आहे.

तसेच, त्रैमासिक आढावा सभेचे आयोजन, दूरदृश्यप्रणाली द्वारे व आठवडा अहवालाद्वारे नियमित आढावा घेऊन रुग्णवाढ झालेल्या संबंधीत जिल्ह्यांना पत्राद्वारे प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे व रुग्णवाढ नियंत्रणात ठेवणे यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याबाबत कळविले जाते. तसेच IHIP पोर्टलवरील माहितीचा देखील आढावा घेतला जातो.

किटकजन्य आजारांच्या प्रतिबंधासाठी खालील उपाययोजना राबविल्या जातात :-

१) आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत घरोघरी जाऊन जलद ताप रुग्ण सर्वेक्षण करण्यात येते.

२) दुर्गम व अतिदुर्गम भागात हिवतापाच्या तात्काळ निदानासाठी रॅपिड डायग्नोस्टीक टेस्ट किट्स द्वारे तपासणी.

३) राज्यातील आरोग्य संस्थेत हिवताप आजाराच्या निश्चित निदानासाठी ८९ तसेच डेंग्यू आजाराच्या निश्चित निदानासाठी ५० सेंटीनल सेंटर्स (प्रयोगशाळा) कार्यान्वित आहेत.

४) हिवतापाच्या तात्काळ निदानासाठी “हिवताप चिकित्सालय” सुरु आहेत.

५) डास नियंत्रणासाठी आरोग्य कर्मचारी यांचेमार्फत प्रभावी कीटकशास्त्रीय सर्वेक्षण नियमित करण्यात येते.

६) डेंग्यू व चिकनगुनिया आजाराचे शहरी भागामध्ये प्रमाण जास्त असल्याने राज्यातील १३ महानगरपालिकांना सर्वेक्षणासाठी ब्रीडिंग चेकर्सच्या माध्यमातून मनुष्यबळ पुरवठा करण्यात आला आहे.

७) किटकजन्य आजारांचा प्रसार डासांच्या मादीमुळे होत असल्याने, डासांच्या मादीची पैदास साठलेल्या व साठवलेल्या स्वच्छ पाण्याच्या साठयांमध्ये होते. त्याकरीता साठलेल्या व साठवलेल्या स्वच्छ पाण्याचे साठे रिकामे करणे, झाकून ठेवणे तसेच पाणी वाहते करणे, आठवडयातील एक दिवस कोरडा दिवस ठरवून त्या दिवशी पाणी साठवणूकीची भांडी रिकामी करुन, आतून घासून-पुसून कोरडी करुन पुन्हा पाणी भरण्यासाठी वापरणे या उपाययोजना करण्याबाबत जनजागृती केली जाते.

८) किटकनाशकांमुळे होणाऱ्या प्रदूषणाचा विचार करुन राज्यामध्ये योग्य डासोत्पत्ती स्थानांमध्ये डास अळीभक्षक गप्पीमासे सोडण्यात येतात. सदर उपाययोजना ग्रामीण तसेच शहरी भागातही आहे

९) दरवर्षी जागतिक हिवताप दिन (२५ एप्रिल) आणि राष्ट्रीय डेंग्यु दिन (१६ मे) तसेच हिवताप प्रतिरोध महिना जून व डेंग्यू प्रतिरोध महिना जुलै विविध उपक्रम घेऊन साजरा केला जातो.

१०) शालेय आरोग्य शिक्षणांतर्गत शालेय विदयार्थ्यांना डासआळी प्रात्यक्षिक दाखवून त्या नष्ट करावयाचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच प्रभात फेरी,निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा अश्या उपक्रमांद्वारे डेंग्यूची जनजागृती केली जाते. तसेच, या उपाययोजनांची अंमलबजावणी करणेसाठी जनतेला आरोग्य शिक्षण दिले जाते.

११) डेंग्यू आजारामध्ये मृत्यूचे प्रमाण कमी करणेसाठी नवीन डेंग्यू व्यवस्थापन व उपचार पध्दतीचे ५०३ प्रशिक्षकांचे प्रशिक्षण (TOT) भीषक (फिजीशियन), बालरोग तज्ञ यांना देण्यात आले. या प्रशिक्षकांनी त्यांचे विभागातील वैद्यकिय अधिकारी व रुग्णालयीन कर्मचारी यांना प्रशिक्षित केले आहे.

• किटकजन्य आजारांचे संनियंत्रण करताना आंतरविभागीय समन्वय साधून, सर्व विभागांचा सहभाग प्राप्त करून घेऊन साथरोगांचा प्रतिबंध करणेकरीता महाराष्ट्रात संसर्गजन्य आजारांबाबत अभ्यास करुन प्रभावी प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाययोजना महाराष्ट्र राज्य संसर्गजन्य आजार प्रतिबंध व नियंत्रण उच्चस्तरिय समिती करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

• राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये चिकुनगुनिया आणि डेंग्यू प्रादुर्भाव संनियंत्रित करणेसाठी उपाययोजना करणेबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील न्हावा शेवा टप्पा क्र.३ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करणेबाबत

(२१) * ७१६१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील न्हावा शेवा टप्पा क्र.३ पाणीपुरवठा योजना काही तांत्रिक अडचणीमुळे अपूर्ण असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पाणी पुरवठा योजनेचा कार्यादेश माहे डिसेंबर, २०२० मध्ये देण्यात आला असून काम पूर्ण करण्याची मुदत ३० महिन्यांपर्यंत असताना योजना कार्यान्वित न झाल्याने पनवेल महानगरपालिका क्षेत्रास तीव्र पाणी टंचाईस सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर न्हावा शेवा टप्पा क्र.३ पाणी पुरवठा योजना तातडीने कार्यान्वित करुन सदर महानगरपालिका हद्दीतील पाणी टंचाई दूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील : (१) हे अंशत: खरे आहे.

कोवीड-१९ हया साथीच्या रोगाच्या प्रादुर्भावामुळे, मशीनरी, मनुष्यबळ उपलब्धता व हालचालीवर आलेली बंधने, मर्यादा, निविदा कार्यादेशानंतर स्टील साहित्यांच्या दरात झालेली असाधारण भाववाढ व त्यामुळे पाईप पुरवठा करण्यास कंत्राटदाराकडून झालेला विलंब, पळस्पेफाटा ते भोकरपाडा दरम्यानच्या राष्ट्रीय महामार्ग लगतची अतिक्रमणे, कोवीड १९ च्या लॉकडाऊन पर्यंतच्या कालावधीत जागेच्या भू-संपादनाच्या कार्यवाहीस झालेला विलंब, जागेचा मोबदला न मिळाल्याने जलवाहिन्या टाकणेस संबंधित जागा मालकांचा अडथळा व रेल्वे, एक्सप्रेसवे, Toll Plaza क्रॉसिंग व ONGC परिसरातून जलवाहिनी टाकण्यास ONGC ने परवानगी नाकारणे इ. तसेच ठेकेदार में. जी.व्ही.पी. आर. इंजिनिअर्स, हैद्राबाद यांचेकडून नियोजनानुसार काम होत नसल्याने त्यांचेवर दंडात्मक कारवाई सुरु आहे.

नवी मुंबई येथील झालेल्या नवीन विमानतळामुळे सभोवतालच्या परिसरामध्ये झालेल्या व होत असलेल्या विविध संस्था जसे की, राष्ट्रीय महामार्ग, MMRDA. MSRDC इ. यांचेमार्फत होणारे रस्त्याचे प्रकल्पामुळे योजनेतून टाकण्यात आलेल्या पाईपलाईनचे स्थलांतरण करणे अपरिहार्य होत आहे. पर्यायाने पूर्ण योजनेच्या भौतिक व आर्थिक गोष्टीवर बंधने येत असून कामास विलंब लागत आहे

(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पनवेल महानगरपालिका क्षेत्रास त्यांचे सद्य:स्थितीतील मागणीनुसार पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(३) योजनेचे काम पूर्ण करणेसाठी माहे मार्च,२०२६ पर्यंत भाववाढीशिवाय मुदतवाढ मंजूर करण्यात आली असून योजनेची कामे विहीत मुदतीत पूर्ण करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्तरावरून आवश्यक पाठपुरावा करण्यात येत असून,

सद्य:स्थितीत योजनेचे काम सुरु असून प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शेगाव (जि.बुलढाणा) तालुक्यातील अनेक गावांमधील गावकऱ्यांच्या केस गळती व नखे गळती संदर्भात करावयाच्या उपाययोजना

(२२) * **८२८३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगाव (जि.बुलढाणा) तालुक्यातील १६ गावांमधील गावकरी केसगळतीच्या समस्येला माहे डिसेंबर, २०२४ पासून सामोरे जात असताना याबाबतचा अहवाल अद्याप आय.सी.एम.आर.कडून अप्राप्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील कठोरा, मच्छिंद्रखेड, बोंडगाव, घुई, कालवड या चार गावात माहे एप्रिल, २०२५ मध्ये नखगळतीची समस्या तीव्र झाल्याने पुणे येथील आरोग्य सेवा सहसंचालक यांनी पहाणी केली असल्याचे दिनांक २२ एप्रिल,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेगाव तालुक्यातील सोळा गावातील केस गळती व चार गावातील नखगळती समस्येबाबतचा अहवाल आय.सी.एम.आर.ने शासनास सादर केला आहे काय,असल्यास तपासाचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणाबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी केंद्रीय पथक ज्यामध्ये आय.सी.एम.आर. प्रतिनिधीचा समावेश होता. त्यांनी दि.२१/०४/२०२५ रोजी बुलढाणा जिल्हयातील संबंधित गावांना भेट दिली असून त्या अनुषंगाने अंतरीम अहवाल दि. २४/०४/२०२५ रोजी सादर केला. मात्र या संदर्भात अंतिम अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(२) होय, हे खरे आहे.

केस गळतीची बाधा झालेल्या सर्व लोकांचे केस परत आले. मात्र त्यापैकी काही लोकांना नंतर नख गळती होत असल्याचे निदर्शनास आल्याने आरोग्य सेवा, सहसंचालक, पुणे. यांनी पहाणी केली. तसेच बाधित लोकांवर आरोग्य विभागामार्फत तपासणी व उपचार करण्यात आले.

(३) केंद्रीय आरोग्य पथकाने सादर केलेल्या अंतरीम अहवालात खालीलप्रमाणे निष्कर्ष सादर केला आहे.

केस गळती व नख गळतीच्या घटना या बुलढाणा जिल्हयातील तीन तालुक्यात आढळल्या असून बहुतांशी घटना या शेगाव तालुक्यातील आहेत. केस गळतीच्या घटना या माहे जानेवारी, २०२५ पासुन आढळण्यास सुरुवात झाली असून सद्य:स्थितीत त्यामध्ये घट होत असल्याचे आढळून आले आहे. केसगळती व नख गळतीच्या घटना या चिकित्सकीयदृष्टया सेलेनॉसिस आजाराची संभावना दर्शवितात. सदर घटना या वातावरणातील एखादया घटकाच्या अचानक संसर्गामुळे उद्भवल्याचे दिसते. त्यामुळे सदर पथकाने या परिसरातील पाणी, माती व अन्नधान्यांचे नमुने सेलेनियम व अन्य जड धातु तपासणीकरिता गोळा केलेले आहेत.

केंद्रीय पथकाने वरील प्रमाणे अंतरीम अहवालातील निष्कर्षात नमुद केल्यानुसार नमुने गोळा केले असून त्याचा अंतिम अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील शासकीय रुग्णालयात बनावट औषधांचा पुरवठा होत असल्याबाबत

(२३) * ९८०७ श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय रुग्णालयात बनावट औषधांचा पुरवठा होत असल्याचे माहे एप्रिल,२०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बनावट औषधांचा पुरवठयाची गंभीर दखल घेऊन आरोग्य विभागाने रुग्णालयांना औषधांचा पुरवठा पश्चात गुणवत्ता तपासणी करण्यासाठी प्रयोगशाळेत औषधी गुणवत्ता तपासणी सुविधा सुरु करण्यास परवानगी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अनुषंगाने आतापर्यंत किती रुग्णालयांच्या औषधांची गुणवत्ता तपासण्यात आली आहे व तपासणी अंती बनावट औषधांचा पुरवठा आढळून आला आहे काय,

(४) असल्यास, बनावट औषध पुरवठा आढळून आलेल्या रुग्णालयांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे खरे नाही.

शासकीय रुग्णालयांमध्ये महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण (MMGPA) मार्फत औषधांचा पुरवठा केला जातो. यात गुणवत्ता तपासणीची प्रक्रिया राबविली जाते. मात्र, स्थानिक स्तरावर काही प्रमाणात अत्यावश्यक औषधे विकत घेण्याची तरतूद असून अशा काही स्थानिक खरेदीमध्ये बनावट औषधांचा पुरवठा झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) जिल्हास्तरावर विविध स्त्रोतांद्वारे उपलब्ध निधितून खरेदी करण्यात येणाऱ्या औषधांची गुणवत्ता तपासणी करण्याचे निर्देश आयुक्त, आरोग्य सेवा यांचेकडील दि.०२/०८/२०२४, दि.२३/०१/२०२५ तसेच दि.२४/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये NABL प्रयोगशाळेमार्फत तपासणी करुनच योग्य असल्यास रुग्णांकरीता प्रत्यक्ष वापर करण्याबाबत सक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) राज्यातील सर्व रुग्णालयांमध्ये पुरवठा करण्यात आलेल्या औषधांची तपासणी NABLमानांकीत प्रयोगशाळेंमार्फत करण्यात आली आहे. यापैकी ७ रुग्णालयांमध्ये अप्रमाणित / कमी गुणवत्तेच्या औषधांचा पुरवठा झाल्याचे आढळून आले आहे.

(४) अप्रमाणित / कमी गुणवत्तेच्या औषध पुरवठादार कंपन्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत आणि त्यांना काळया यादीत टाकण्याची कार्यवाही सुध्दा करण्यात आली आहे. तसेच, संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक यांची सुध्दा चौकशी करण्यात आली आहे आणि या संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात आली असून संबंधितांवर विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

तारापूर (जि.पालघर) येथील औद्योगिक क्षेत्रातील मे. कॅमलिन फाईन सायन्सेस या कंपनीत वायू गळती झाल्याबाबत

(२४) * १०६२४ श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (जि.पालघर) येथील औद्योगिक क्षेत्रातील मे. कॅमलिन फाईन सायन्सेस या कंपनीत अचानक वायू गळती झाल्याने दहा कामगारांना वायूबाधा झाल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्याअनुषंगाने सदर औद्योगिक क्षेत्रामध्ये अशा घटनांची पुनरावृत्ती होवू नये याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन दोषी कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर : (१) हे खरे आहे.

तारापूर (जि.पालघर) येथील औद्योगिक क्षेत्रातील मे. कॅमलिन फाईन सायन्सेस लि., बोईसर, ता.जि.पालघर या कारखान्यात दिनांक १८/०५/२०२५ रोजी डायमिथाइल सल्फेट या द्रवरुपी रसायन साठवणूक टाकीच्या व्हेंट लाईनमधून ओव्हरफ्लो होऊन जमिनीवर सांडले गेले. सदर सांडलेल्या रसायनाच्या वाफा तयार होऊन ११ कामगारांच्या डोळयांना जळजळण्याचा त्रास झाला.

(२) व (३) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत सदर घटनेची चौकशी करण्यात आली असून रसायनाचे स्थलांतर करीत असताना व्हेंट लाईनमधून अपायकारक वायू बाहेर जाण्यापासून प्रतिबंध करण्यासाठी कोणतीही सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आलेली नव्हती. सबब, आढळून आलेल्या

भंगाबाबत भोगवटादाराविरुध्द प्रथम न्यायदंडाधिकारी, पालघर यांचे न्यायालयात खटला दाखल करण्यात आलेला आहे.

तसेच, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ कार्यालयाकडून कारखाना बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सदर घटनेची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सुचविलेल्या सुरक्षिततेबाबतच्या उपाययोजनांची पुर्तता कारखाना व्यवस्थापनाकडून करुन घेण्यात आलेली आहे.

पालघर कार्यक्षेत्रात अशा प्रकारच्या घटनाची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून संचालनालयामार्फत मॉकड्रिल, कामगारांमध्ये सुरक्षिततेच्या जनजागृतीसाठी कार्यशाळा, प्रशिक्षणे, चर्चासत्रे इ. उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील औद्योगिक वसाहतींमध्ये आगीच्या घटना रोखणेसह अग्निशमन केंद्र उभारणेबाबत

(२५) * ७३४५ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक ठिकाणी औद्योगिक वसाहतींमध्ये आग लागण्याच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अक्कलकोट रोड (जि.सोलापूर) औद्योगिक वसाहतीत दिनांक १८ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास एका कापड मीलला आग लागणे तसेच लोटे औद्योगिक वसाहतीत (ता.खेड, जि.रत्नागिरी) माहे मे, २०२५ मध्ये स्फोट झाल्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढत्या आगीच्या घटना लक्षात घेता सन २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तत्कालीन उद्योग मंत्री महोदयांनी राज्यातील प्रत्येक औद्योगिक वसाहतीत अग्निशामक केंद्र उभारण्याचे आश्वासन देऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन आगींच्या घटना रोखणेसह राज्यातील प्रत्येक औद्योगिक वसाहतीत अग्निशमन केंद्र उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत : (१) हे खरे नाही.

म.औ.वि.महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्रात प्राप्त होणाऱ्या वदर्यांचा मागील ०३ वर्षाचा आढावा लक्षात घेता अग्निशमन वर्दींमध्ये घट झाल्याचे निदर्शनास येत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

दि.१८/०५/२०२५ रोजी सकाळी ०५.२८ वा.सोलापूर येथील अक्कलकोट एमआयडीसीमध्ये मे.सेंट्रल टेक्सटाईल, या टॉवेलच्या कारखान्यास आग लागली होती. तसेच दि.१८/०५/२०२५ रोजी लोटे-परशुराम औद्योगिक क्षेत्रातील मे.ॲक्विला ऑरगॅनिक्स प्रा.लि.या कारखान्यात आगीचा भडका होऊन दोन कर्मचारी भाजल्याची घटना घडली होती.

(३) व (४) हे खरे नाही.

म.औ.वि. महामंडळामार्फत धुळे, जळगांव, सातारा, सुपा-पारनेर, गोकुळ शिरगांव या औद्योगिक क्षेत्रात अग्निशमन केंद्र बांधुन कार्यान्वित करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच औद्योगिक वसाहतीमधील संभाव्यह आगीचे धोके लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार औद्योगिक क्षेत्रात अग्निशमन केंद्रे बांधून कार्यान्वित करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

रुईछत्रपती (ता. पारनेर, जि.अहिल्यानगर) येथील कोल्हापूर बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(२६) * **७२८८ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुईछत्रपती (ता.पारनेर, जि.अहिल्यानगर) येथील (ढास) वाबळे मळा येथील नदीवर रु.१ कोटी २० लाख २७ हजार रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या कोल्हापूर बंधाऱ्याचे काम श्रीगोंदा येथील कंत्राटदाराने निकृष्ट दर्जाचे केल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी दिनांक २५ एप्रिल,२०२५ रोजी वा त्यासुमारास जलसंधारण विभागाकडे ऑनलाईन पद्धतीने दाखल केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची तक्रार केली म्हणून ठेकेदाराने तक्रारकर्त्याला शिवीगाळ, दमदाटी करून जिवे मारण्याची धमकी दिल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंधारा कामात आवश्यकतेनुसार पाया खोदाई न करणे, पायाभरणी व भिंती कामासाठी अतिशय कमी सिमेंटचा वापर करणे, केलेल्या कामावर आवश्यकतेनुसार पाणी न मारणे, खडी उखडलेली असणे, बंधाऱ्याच्या भिंतींना तडे जाणे इत्यादी तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी कंत्राटदार यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय राठोड : (१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.
या प्रकरणी क्षेत्रिय कार्यालयास कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) तक्रारदार यांच्या दि.०७/०३/२०२५ रोजीच्या प्राप्त तक्रार अर्जानुसार प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण पथक (मृद व जलसंधारण छत्रपती संभाजीनगर) यांनी दि. ११/०३/२०२५ रोजी बंधाऱ्याच्या कामाची पाहणी केली आहे. तसेच नियुक्त तपासणी पथकातील उपविभागीय जलसंधारण अधिकारी, श्रीगोंदा व पारनेर यांनी दि. १४/०५/२०२५ रोजी संयुक्त पाहणी केलेली आहे. सदर बंधाऱ्याच्या कामाच्या तपासणी अंती योजनेचे काम निकषांप्रमाणे/समाधानकारक गुणवत्तापूर्वक व चांगल्या प्रतीचे झाले असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे संबंधित कंत्राटदारांविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

वसई - विरार महानगरपालिका क्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या शाळा धोकादायक स्थितीत असल्याबाबत

(२७) * **९५०८ श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई – विरार शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील जिल्हा परिषद शाळांच्या इमारतींची पावसाळयात कोणत्याही प्रकारची दुर्घटना होऊ नये यासाठी संरचनात्मक लेखापरीक्षण करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२५

मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लेखापरीक्षण अहवालात अंदाजे ९० शाळांपैकी ११ शाळा अतिधोकादायक स्थितीत असल्याचे निदशर्नास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक शाळा या फार जुन्या असून शाळांच्या भिंतींना तडे जाणे, प्लास्टर निखळून पडणे, फरशी तुटणे, छतगळती अशा अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय ,
(४) असल्यास, उक्त शहरात माहे जुलै,२००९ मध्ये महापालिका स्थापन झाल्यापासून पालिकेने एकही शाळा उभारली नसून कार्यक्षेत्रात येत असलेल्या जिल्हा परिषद शाळा पालिकेकडे हस्तांतरित करण्याची मागणी मागील अनेक वर्षांपासून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पूर्वीच्या काळामध्ये अनेक लोकांनी आपल्या मालकीच्या जमीनी तत्कालीन लोकल बोर्डाच्या शाळा उभारण्यासाठी दान म्हणून देण्यात आल्या होत्या मात्र सध्या नवीन शाळांची उभारणी करताना वाद न होणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,
(६) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने उक्त महानगरपालिका क्षेत्रातील जिल्हा परिषद शाळा महापालिकेकडे हस्तांतरित करून शाळांची दुरुस्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे : (१), (२),(३) व (४) होय, हे खरे आहे.
(५) वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११६ जिल्हा परिषद शाळांचे उपलब्ध सातबारा उतारे, दानपत्र व इतर दस्तऐवज वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यालयास सादर करण्यात आले आहेत.
(६) सदर शाळा इमारतींची दुरुस्ती करणेबाबत वसई-विरार शहर महानगरपालिका यांना जिल्हा परिषद पालघर यांनी वेळोवेळी पत्रान्वये कळविले आहे. तसेच अतिधोकादायक असलेल्या १२ जिल्हा परिषद शाळांपैकी ४ जिल्हा परिषद शाळांचे निर्लेखन करण्याबाबतची कार्यवाही जिल्हा स्तरावरुन करण्यात येत आहे. उर्वरित ८ जिल्हा परिषद शाळांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत महानगरपालिका यांना दि.०३/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील गतिमंद मुला-मुलींसाठी असलेल्या बालगृहांपैकी ९४ बालगृहे बंद असल्याबाबत

(२८) * ९३०४ श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गतिमंद मुला-मुलींसाठी असलेल्या बालगृहांपैकी ९४ बंद असून बहुतांश बाहगृहांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बंद असलेली बालगृहे पुन्हा सुरु करण्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबत स्पष्टीकरण तसेच समन्वय समिती व तज्ञांसमवेत सल्लामसलत करुन बालगृहे प्रभावीपणे सुरु राहणेबाबत आवश्यक बाबींच्या माहितीसंदर्भात सर्वंकष प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने शासनाला माहे मार्च,२०२५ मध्ये दिले

असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन बंद असलेली बालगृहे सर्व सोई-सुविधांसह सुरु करणे व बालगृहांची दुरुस्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे : (१) हे खरे नाही.

मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशातील ९४ बालगृहे ही गतिमंद मुलांची बालगृहे नसून ती काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या सामान्य मुलांची बालगृहे आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशातील ९४ बालगृहे ही गतिमंद मुलांची बालगृहे नसून ती काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या सामान्य मुलांची बालगृहे आहेत. सदर बालगृहांना बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) २०१५ अंतर्गत मान्यता देण्यात आली होती. तथापि सदर ९४ बालगृहे ही संबंधित संस्थांचालकांनी स्वत:हून बंद केलेली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नोकरी मिळणेबाबत

(२९) * १२०५७ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या माध्यमातून नोंदणीमध्ये झालेल्या प्रतीक्षा यादीतील ३०१६ उमेदवारांना अद्यापी नोकऱ्या मिळाल्या नसल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१८ मध्ये सर्व कागदपत्र छाननी, मैदानी परीक्षा घेऊन भरतीप्रक्रिया राबावून ३६३३ युवांना अधिकृत बी फॉर्म देऊन नोंदणी केली होती मात्र गेल्या पाच वर्षात प्रतिक्षा यादीतील केवळ ६१७ जणांनाच आतापर्यंत नोकऱ्या मिळाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामध्ये अधिकारी, कंपनी, खासगी सुरक्षारक्षक एजन्सींचे एकमेकांशी संगनमत असल्याप्रकरणी संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर सुरक्षा रक्षकांच्या कामकाजात अनेक प्रकारच्या अनियमितता असल्याने सुरक्षारक्षकांना नोंदणीचा त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती यामध्ये दोषी असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर व सुरक्षा एजन्सी यांच्याविरुद्ध कारवाई करण्यासह प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नोकरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर : (१) अशंत: खरे आहे.

एकूण ३६३३ सुरक्षा रक्षकांपैकी ३००५ सुरक्षा रक्षक सद्य:स्थितीत नियुक्तीच्या प्रतिक्षित आहेत ही वस्तुस्थिती आहे.
(२) रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळामार्फत सदरहू सुरक्षा रक्षकांपैकी एकूण ६२८ सुरक्षा रक्षकांना विविध आस्थापनेमध्ये नोकऱ्या देण्यात आलेल्या आहेत.

(३) या प्रकरणी लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी पत्र व्यवहार केलेला आहे, हे खरे आहे.

(४) आणि (५) रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या कार्यक्षेत्रातील सदरहू प्रतिक्षेत असलेल्या ३००५ नोंदीत सुरक्षा रक्षकांना विविध आस्थापनांमध्ये लवकरात लवकर नियुक्ती देण्याच्या दृष्टीकोनातून शासन स्तरावर दि.२५/०६/२०२५ रोजी सर्व संबंधितांची बैठक घेण्यात आलेली आहे. सदर बैठकीच्या अनुषंगाने मंडळाच्या कार्यक्षेत्रातील ज्या आस्थापना मंडळात नोंदीत आहेत, तथापि मंडळाचे सुरक्षा रक्षक नियुक्त करत नाहीत, ज्या आस्थापना मंडळात नोंदीत नाहीत व अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही केलेली नाही अशा सर्व आस्थापनांची तपासणी करण्याच्या अनुषंगाने स्वतंत्र २ समित्या उप आयुक्त कामगार यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्याबाबत सह आयुक्त (माथाडी) यांना आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच ज्या आस्थापना सुरक्षा रक्षक अधिनियमातील तरतुदी नुसार काम करत नाहीत अशा दोषी आस्थापनांविरुध्द अधिनियमातील तरतुदी नुसार तात्काळ कायदेशीर कार्यवाही करुन अशा आस्थापनांमध्ये मंडळाच्या समुच्चय पुलातील सदरहू सुरक्षा रक्षकांच्या नियुक्तीबाबत क्रमनिहाय कार्यवाही करावी असे सह आयुक्त (माथाडी) व अध्यक्ष, रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक यांना आदेश दिलेले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथे वैद्यकीय सेवासंदर्भात लागणारी यंत्रसामग्रीचा पुरवठा करणेसह इमारत बांधकामासाठी सादर केलेल्या प्रस्तावाबाबत

(३०) * ७९३४ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथे टप्पा-३ अंतर्गत Castro Entrology, Implant Surgery (Knee Implant, Hip plant, Conchelear Implant) विभाग (युनिट) सुरु करण्याकरिता १०० खाटांच्या इमारत बांधकामासाठी तसेच त्याकरिता लागणारी यंत्रसामुग्रीचा पुरवठा करणे याबाबतचा प्रस्ताव रुग्णालयाकडून शासनास दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी वा सुमारास पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कर्करोग शस्त्रक्रिया, रेडिएशन आन्कोलॉजी युनिट व डे केअर केमोथेरपी रुग्णांचे उपचाराकरिता PET CT Machine त्याकरिता लागणारे मनुष्यबळ इ. बाबतचा रु.३७ कोटीचा प्रस्ताव रुग्णालयाकडून सह संचालक, आरोग्य सेवा, आयुक्तालय यांचेकडे तसेच शासनाकडे दिनांक २२ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास पाठविण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, या रुग्णालयात Cardiac Cathlab Machine with Neuro Angiogram,३ D Rational angiography Turnkey या यंत्रणेचा पुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव रुग्णालयाकडून दिनांक २२ एप्रिल, २०२५ रोजी तसेच त्यापूर्वी देखील शासनाकडे पाठविण्यात आलेला असून देखिल अद्याप या यंत्रणेचा पुरवठा करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अमरावती येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयाने वैद्यकीय सेवासंदर्भात लागणारी यंत्रसामग्री, मनुष्यबळ तसेच इमारत बांधकामासाठी सादर केलेल्या प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे अंशत: खरे आहे.

१०० खाटांच्या इमारत बांधकामाचा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. उपकरणांबाबतचा प्रस्ताव आयुक्त स्तरावर प्राप्त झाला असून त्यांच्याकडून प्रस्तावाची छाननी करण्यात येत आहे.

(२) हे खरे आहे.

PET CT Machine त्याकरिता लागणारे मनुष्यबळ इ. बाबतचा प्रस्ताव आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांना प्राप्त झाला असून सदर प्रस्तावाची आयुक्त स्तरावर छाननी सुरू आहे.

(३) हे खरे आहे. या सदर्भातील वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

उपलब्ध निधीच्या मर्यादेत विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक व अमरावती करीता आवश्यक यंत्रसामग्री व साधन सामग्री खरेदीसाठी शासन निर्णय दि.२०/०६/२०२४ अन्वये रु.२९,४०,३५,०००/- एवढ्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदरहू प्रस्तावाच्या अनुषंगाने खरेदी प्रस्ताव महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणास पाठविण्यात आला असून महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणामार्फत निविदा प्रक्रिया राबवून दि.११/०४/२०२५ अन्वये विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक व अमरावती करीता प्रत्येकी १ कार्डियाक कॅथलॅब खरेदी करणेबाबत पुरवठा आदेश निर्गमित केले आहे. सदरहू कॅथलॅब पुरवठा करुन स्थापित करणेबाबतची कार्यवाही महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणामार्फत सुरू आहे.

(४) व (५) उपरोक्त (१), (२) व (३) येथे नमूद केल्याप्रमाणे तसेच अतिविशेषोपचार तज्ञ या पदांचे सेवा प्रवेश नियम दि.२४/०४/२०२५ रोजीच्या अधिसुचनेव्दारे अधिसूचित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार अतिविशेषोपचार तज्ञांची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याकरीता कार्यवाही चालू आहे.

शिर्डी (ता.राहाता, जि.अहिल्यानगर) येथे चार भिक्षेकऱ्यांचा झालेला मृत्यू

(३१) * ७३६९ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्डी (ता.राहाता, जि.अहिल्यानगर) येथे साईभक्तांना त्रास देत असल्याचा संशय घेऊन शिर्डी नगरपरिषद व शिर्डी संस्थान यांनी संयुक्तपणे कारवाई करून ५० हून अधिक भिक्षेकरुंना विसापूर (ता.श्रीगोंदा) येथील भिक्षेकरीगृहात ठेवले असता दहा भिक्षेकरुंची तब्येत बिघडल्याने त्यांना जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथे दाखल केले असता चार भिक्षेकरुंचा मृत्यू झाला असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भिक्षेकऱ्यांना रुग्णालयात जमिनीवर झोपवून त्यांचे हातपाय बांधून त्यांना वेळेवर वैद्यकीय सुविधा, पाणी मिळाले नसल्याचे आरोप त्यांच्या नातेवाईकांकडून करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयातील कर्मचाऱ्यांचा निष्काळजीपणा तसेच अमानवीय वागणुकीमुळेच भिक्षेकऱ्यांचा मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त केला जात असून रुग्णालय व्यवस्थापनातील त्रुटी आणि जबाबदारीवर प्रश्न उपस्थित होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागराज चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन या घटनेस जबाबदार असण्याऱ्या संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करणेसह अशा प्रकारच्या घटना भविष्यात टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

दाखल झालेले रुग्ण हे ALCOHOLIC असल्याने उपचाराच्यावेळी त्यांना ALCOHOL WITHDRAWAL SYNDROME चे लक्षण असल्याने त्यांना वैद्यकीय उपचार देण्यासाठी Restrain करण्यात आले होते.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) जिल्हा शल्यचिकित्सक यांनी नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार सदर प्रकरणात रुग्णालयात योग्य उपचार झाले आणि कोणताही अधिकारी व कर्मचारी यांचा कुठल्याही प्रकारचा हलगर्जीपणा दिसून आला नाही. मात्र सदर प्रकरणी उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक यांचे स्तरावरून समिती स्थापन करून चौकशीचे आदेश दिले असून सदर समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे आणि त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

मौजा मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील नरसाळा लघू प्रकल्पातील कालवा व वितरण प्रणालीच्या दुरुस्तीबाबत

(३२) * ११०८९ श्री.संजय देरकर (वणी) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील नरसाळा लघू प्रकल्पाचे जीर्ण झालेले अस्तरीकरण, खचलेले भराव, कालव्यातील पुलांची दुरवस्था तसेच अनेक ठिकाणी फुटलेला कालवा यामुळे पाण्याचा मोठा अपव्यय होत असून धरणात १०० टक्के पाणी साठा असतांनाही शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत १० वर्षांपासून या धरणावरील मायनार कालवा नादुरुस्त असल्याने सिंचनासाठी पाणी सोडणे बंद केले असून सदर कालव्यावर नागरिकांनी अतिक्रमण करण्यास सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पातील कालवा व वितरण प्रणालीच्या दुरुस्तीच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी पहापळ, भालेवाडी, मदनापूर, धामणी गावातील ग्रामस्थांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त धरणाचा कालवा व वितरण प्रणालीची तातडीने दुरुस्ती करुन शेतक-यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय राठोड : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) मौजा मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील नरसाळा लघु प्रकल्पाचे बांधकाम १९९२ साली पूर्ण करण्यात आले आहे. सदर प्रकल्प जलसंपदा विभागाकडून माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये हस्तांतरीत करण्यात आला आहे. वितरण प्रणाली बरेच वर्ष जुनी असल्याने कायमस्वरुपी उपाययोजना करण्याच्या दृष्टीकोनातून सदर प्रकल्पावर बंदिस्त नलिका वितरण प्रणाली प्रस्तावित केली असून दि.२६/०७/२०२४ अन्वये जलसंधारण महामंडळाकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून सदर कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. पुढील ३ वर्षात सदर योजनेचे सिंचन क्षेत्र पुर्नस्थापित करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात अनधिकृत वैद्यकीय प्रयोगशाळांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र कायदा तयार करणेबाबत

(३३) * ७६५४ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.शंकर जगताप (चिंचवड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनधिकृत वैद्यकीय प्रयोगशाळांवर (पॅथॉलॉजी लॅब्स) नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र कायदा तयार करण्यात येईल असे माहे जुलै, २०२४ मध्ये विधानसभेत मा. मंत्री, उदय सामंत यांनी जाहीर केले असून देखील अद्यापही सदर कायद्याची अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच,राज्यात विशेषत: पिंपरी-चिंचवड व पुणे शहरात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर खाजगी रुग्णालये तसेच खाजगी पॅथॉलॉजी लॅबमध्ये चाचण्यांच्या शुल्कावर नियंत्रण नसल्याने सामान्य रुग्णांची आर्थिक लूट होत असून शहर उपनगराचा व जिल्ह्याच्या ग्रामीण भागात वैद्यकीय चाचण्यांसाठी वेगवेगळे दर आकारण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा अनधिकृत पॅथॉलॉजी लॅब शोधण्यासाठी जिल्हास्तरावर शोध मोहिम राबविण्याचे नियोजित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार राज्यातील अनधिकृत वैद्यकीय प्रयोगशाळा कारवाई करणेसह अशा लॅबवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र कायदा तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे तसेच तपासणी शुल्काचे प्रमाणीकृत दर निश्चित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१),(२),(३),(४) व (५) मुंबई शुश्रूषा-गृह नोंदणी अधिनियम, १९४९ अंतर्गत खाजगी रुग्णालयांची तपासणी करण्यात येते. तथापि, सदर कायदयाअंतर्गत वैदयकीय प्रयोगशाळांच्या तपासणी करण्याची तरतूद नसल्याने वैदयकीय प्रयोगशाळांसंदर्भात कायदा तयार करण्याची निकड भासली. सबब, महाराष्ट्र राज्यात वैद्यकीय प्रयोगशाळा (मेडिकल लॅबोरेटरी) व्यवसायासंदर्भात नियमन करण्याकरीता कायदयाचे प्रारुप विधी व न्याय विभागाकडे सादर करण्यात आले. विधी व न्याय विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार राज्याचा कायदा तयार करण्याची बाब या विभागाच्या कार्यवाहीखाली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस पदभरती प्रक्रियेत झालेली अनियमितता

(३४) * १०६७१ श्री.संदिप क्षीरसागर (बीड), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.संजय देरकर (वणी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकात्मिक बालविकास प्रकल्प अंतर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस पदभरती प्रक्रियेमध्ये आर्थिक अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विशेषत: बीड, यवतमाळ जिल्हयातील झरी, मुखेड, लोहा (जि.नांदेड) येथे पात्र उमेदवारांना डावलून अपात्र उमेदवारांची भरती झाली असल्याचे तसेच निलज (ता.पवनी,जि.भंडारा) येथे बनावट गुणपत्रिकेद्वारे एका महिलेची नियुक्ती करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी त्रयस्त समितीच्या वतीने चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व सदर भरती प्रक्रिया रद्द करुन पात्र उमेदवारांची भरती करण्यात यावी अशी मागणी उमेदवारांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर भरती प्रक्रियेत झालेल्या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या सबंधितांवर कारवाई करणेसह पात्र उमेदवारांना अंगणवाडी सेविका म्हणून सेवेत घेण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे : (१), (२), (३), (४) व (५) एकात्मिक बाल विकास सेवा योजेनेंतर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानुषंगाने काही ठिकाणी अंगणवाडी सेविका व मदतनीस पदभरती प्रक्रियेसंदर्भात तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. सदर तक्रारींच्या अनुषंगाने प्रकरणनिहाय चौकशी करुन कार्यवाही करण्यात येत आहे.

गडचिरोली जिल्हयामध्ये मुख कर्करोगाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजना

(३५) * **८७६४ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय दंत महाविद्यालय ,नागपूर येथील सामाजिक दंतशास्त्र विभागाने गडचिरोली जिल्हयामध्ये केलेल्या आरोग्य विषयक सर्वेक्षणात २३ हजार मुलांच्या मुखाची तपासणी करण्यात आली असता यामध्ये ३४८७ (१५ टक्के) मुलांमध्ये मुखपूर्व कर्करोगाची लक्षणे दिसून आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुख कर्करोगाचे मुख्य कारण हे गांजा, तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ सेवन असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुख कर्करोगाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ : (१) होय.
(२) होय.
(३) शासनामार्फत सदर वाढता प्रादुर्भाव रोखण्याकरीता वेळोवेळी उपाययोजना करण्यांत येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या यांत्रिकी सफाई कामाच्या निविदा प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

(३६) * **१२२४३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५४७ रुग्णालय व १९८४ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या यांत्रिकी सफाई कामाच्या निविदा पुण्यातील मे.बी.एस.ए. कार्पोरेशन लिमिटेड कंपनीला नियम डावलून देण्यात आल्याचे दिनांक १ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू यांत्रिकी सफाईच्या कामात कंत्राटदारास आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी दोन वर्षात निविदेची किंमत रु. ७७ कोटी ५५ लाखावरुन रु.५७० कोटी इतकी वाढवून उपरोक्त कंपनीस बेकायदा व नियमबाह्यरित्या कंत्राट देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषींविरुद्ध कारवाई करणेसह सदर नियमबाह्य निविदा तात्काळ रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे खरे नाही.

निविदेमधील अनुभवाच्या अटी व शर्तीनुसार पात्र ठरलेला निविदाकार मे.बी.एस.ए.कोर्पोरेशन प्रा.लि., पुणे यांना दि. ०३/०९/२०२४ रोजी Letter of Intent देण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

शासन निर्णय क्रमांक प्रशामा १२२२/प्र.क्र ०१/ आरोग्य -७, दिनांक २१ एप्रिल, २०२२ अन्वये राज्यातील एकूण ५०३ आरोग्य संस्थांमध्ये मनुष्यबळाव्दारे स्वच्छता सेवा करणेकरीता प्रदान करण्यात आल्याने निविदेची किंमत रु.७७ कोटी ५५ लाख होती.

तथापि, शासन निर्णय क्रमांक प्रशामा-१२२२/प्र.क्र ०१/आरोग्य -७, दि.१८/०९/२०२३ अन्वये राज्यांतर्गत एकूण ५९७ आरोग्य संस्था आणि जिल्हयांतर्गत, जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे अधिनस्त असलेले जिल्यातील एकूण १९०६ प्राथमिक आरोग्य केंद्र एकूण २५०३ आरोग्य संस्थांच्या एकत्रित प्रस्तावास रु.६३८/-कोटी इतक्या रक्कमेची स्वच्छता सेवेबाबत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. संस्था वाढल्याने आणि स्वच्छतेचा दर्जा उंचावणेकरीता यांत्रिकी पध्दतीने स्वच्छता सेवा घेण्यात आल्याने निविदेची किंमत रु.६३८/-कोटी इतकी झाली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

पुण्यातील ससून रुग्णालयाशी संलग्न बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयामध्ये निवासी डॉक्टरांवर रॅगिंग झाल्याबाबत

(३७) * ७३७६ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये रॅगिंगच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून विद्यार्थ्यांचे शारिरीक आणि मानसिक शोषण होत असून शैक्षणिक नुकसानीमुळे आत्महत्येच्या प्रमाणात वाढ होत आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, पुण्यातील ससून रुग्णालयाशी संलग्न बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयामध्ये दोन निवासी डॉक्टरांवर रॅगिंग झाल्याप्रकरणी विद्यार्थ्यांनी वरिष्ठ निवासी डॉक्टरांविरोधात केलेल्या तक्रारीची कॉलेज पातळीवर दखल घेतली गेली नसून यासंदर्भात मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांचेकडेही लेखी तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे

काय,
(३) असल्यास, रॅगिंगविरोधी कायद्याचे कठोर पालन न होणे, अंतर्गत शिस्तभंग समित्यांचे अपयश व महाविद्यालय प्रशासनाची निष्क्रियता यामुळे अशा घटना वारंवार घडत असून अनेक विद्यार्थी भीतीमुळे किंवा दबावामुळे रॅगिंगची तक्रार करत नसल्याने तक्रार दाखल करण्याची सुरक्षित आणि गोपनीय व्यवस्था महाविद्यालयांनी केली आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये झालेल्या रॅगिंगच्या सर्व तक्रारींची दखल घेवून अशा घटना रोखण्यासाठी महाविद्यालयांमध्ये स्वतंत्र देखरेख यंत्रणा व प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन रॅगिंगग्रस्त विद्यार्थ्यांचे मानसिक समुपदेशन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच यातील दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ : (१) हे खरे नाही.
(२) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथील अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभागातील कनिष्ठ निवासी-१ डॉक्टरांवर रॅगिंग झाल्याची तक्रार अधिष्ठाता यांचेकडे प्राप्त झाली होती. सदर तक्राराची अधिष्ठाता स्तरावर तातडीने दखल घेऊन कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच याविषयक तक्रार मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व मा. राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचेकडे देखील प्राप्त झाली आहे.
(३) व (४) राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी रॅगिंग विषयी उपाययोजना करण्यासाठी National Medical Commission (Prevention & Prohibition of Ragging in Medical Colleges & Institutions) Regulations, २०२१ प्रसिद्ध केले आहेत. सदर नियमांनुसार राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता स्तरावर स्वतंत्र अँटी रॅगिंग समितीची स्थापना करण्यात आली असून, सदर समिती वेळोवेळी विद्यार्थ्यांच्या समस्यांबाबत आढावा घेत असते. तसेच अधिष्ठाता स्तरावर गठीत अँटी रॅगिंग समितीने महाविद्यालयात होणारे रॅगिंग रोखण्यासाठी वेळोवेळी उपाययोजना करणेबाबत संचालनालयामार्फत सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.
(५) व (६) अधिष्ठाता, बै. जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे यांच्याकडे रॅगिंग विषयक प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अस्थिव्यंगोपचार विभागातील तीन कनिष्ठ निवासी डॉक्टरांवर सहा महिने निलंबनाची व एक लक्ष रुपये दंडाची कार्यवाही करण्यात आलेली आहे. अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभाग प्रमुख यांची महाविद्यालयातून बदली करण्यात आलेली आहे. तसेच अधिष्ठाता, बै. जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे यांना रॅगिंग विषयक घटना रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

अस्थिव्यंग शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या इम्प्लाण्टचा दर्जा व किंमतीवर नियंत्रण ठेवणारी स्वतंत्र यंत्रणा स्थापन करणेबाबत

(३८) * ७६५५ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील काही औषध कंपन्यांचे विक्रेते अस्थिव्यंग शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणा-या इम्प्लाण्टच्या मूळ किंमतीवर ३० ते ४० टक्के जादा दर आकारून रुग्णांची आर्थिक लूट करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इम्प्लाण्टच्या पॅकिंगवर एम.आर.पी. नमूद नसल्यामुळे मूळ किंमतीपेक्षा अधिक दराने विक्री होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, सध्या बनावट इम्प्लाण्टचा व्यवसाय तेजीत असून सदर इम्प्लाण्ट असली की बनावट आहे हे तपासण्याची कोणतीही व्यवस्था डॉक्टरांकडे उपलब्ध नसल्याने रुग्णांच्या जीवितास धोका निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार इम्प्लाण्टच्या बनावट उत्पादनांचा पुरवठा करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करणेसह त्यांचा दर्जा व किंमतीवर नियंत्रण ठेवणारी स्वतंत्र यंत्रणा स्थापन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. नरहरी झिरवाळ : (१), (२), (३) व (४) National Pharmaceutical Pricing Authority (NPPA) च्या दि.३१/०३/२०२० रोजीच्या अधिसूचनेद्वारे सर्व वैद्यकीय उपकरणांच्या किंमती औषध किंमत नियंत्रण आदेश, २०१३ च्या तरतुदी नुसार नियंत्रित केल्या जात आहेत. केंद्र शासनाच्या दि.३१/०१/२०१७ च्या अधिसूचनेनुसार वैद्यकीय उपकरणे (Medical Devices) यांचे उत्पादन, साठवणूक आणि विक्री/वितरण यांच्या नियंत्रणासाठी औषधे व सौदर्यं प्रसाधने कायदा, १९४० अंतर्गत Medical Devices Rules, २०१७ अस्तित्वात आले आहेत. त्यानुसार वैद्यकीय उपकरणांचे (Medical Devices) उत्पादन परवाना नोंदणीअंतर्गत विक्री व वितरण नियंत्रित केले जाते. सदर Medical Devices Rules, २०१७ नुसार वैद्यकीय उपकरणांचे A, B, C व D याप्रमाणे वर्गीकरण करण्यात आले आहे.
Class A Medical Devices - Low Risk
Class B Medical Devices - Low Moderate Risk
Class C Medical Devices - Moderate High Risk
Class D Medical Devices - High Risk

Class A व B या उपकरणांचे नियंत्रण राज्यांद्वारे तसेच Class C व D या उपकरणांचे नियंत्रण केंद्र शासनाद्वारे केले जाते. “इम्लाण्टस” हे C व D या वर्गामध्ये मोडत असून या प्रकारच्या उपकरणांवर औषध नियंत्रक, भारत सरकार (Central Drugs Standard Control Organization) यांच्याकडून नियंत्रण ठेवले जाते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

जितेंद्र भोळे
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.